


# शहरातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता

**शहरातील प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचा विचार करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, आणि बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्या वतीने एका कार्यशाळेचे मुंबईत आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा हा वृत्तांत.**

**- सुप्रिया सुळे**
**खासदार**

प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी आपण ज्या ज्या वेळी बोलतो, विचार करतो त्या त्या वेळी प्रामुख्याने ग्रामीण भागातील शिक्षणच आपल्या नजरेसमोर असते आणि ते स्वाभाविकच आहे. पण महाराष्ट्रासारख्या राज्यासाठी ते पुरेसे नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यात नागरी क्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाचेही प्रश्न मोठे आहेत, त्यांचे स्वरुप ग्रामीण भागातील शिक्षणाच्या प्रश्नांपेक्षा खूपच वेगळे आहे आणि त्यांचा स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज आहे हे बरेचदा विचारात घेतले जात नाही.

महाराष्ट्र हे देशातील फार मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झालेले राज्य आहे. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्येचे प्रमाण ४२% एवढे होते. शहरी भागातील लोकसंख्या वाढीचा हा वेग असाच कायम राहिला तर (आणि हा वेग कमी व्हायला कोणतेही कारण दिसत नाही) या पुढच्या काळात शहरी भागातील प्रमाण ग्रामीण भागापेक्षाही जास्त होईल.

शहरी भागातील लोकसंख्येची, आणि त्यामुळेच या भागातील प्राथमिक शिक्षणाचीही सर्वात महत्वाची दोन वैशिष्ट्ये म्हणजे विविधता आणि विषमता. विविध भाषामाध्यमे, शाळांमध्ये सुरु असलेले वेगवेगळ्या शिक्षण मंडळांचे अभ्यासक्रम, शाळांच्या व्यवस्थापनांचे विविध प्रकार अशा अनेक बाबतीत महापालिका क्षेत्रात कमालीची विविधता आढळून येते. त्याचबरोबर शाळेत येणाऱ्या मुलांचा आर्थिक स्तर, शाळांचा शैक्षणिक स्तर, शाळांकडे उपलब्ध असलेल्या सुविधा याबाबतीत कमालीची विषमता आढळून येते. ग्रामीण भागाच्या तुलनेत शाळांकडे उपलब्ध असलेल्या सुविधा आणि शिक्षकांची शैक्षणिक अर्हता या बाबतीत शहरी भागातील परिस्थिती बरीच चांगली असली तरी महानगरपालिकांच्या बहुसंख्य शाळांचा दर्जा, तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अनेक खाजगी शाळांचा दर्जा ग्रामीण भागातील अनेक शाळांपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. ग्रामीण शहरी भागातही विद्यार्थ्यांच्या प्राथमिक आणि विशेषतः उच्च प्राथमिक स्तरावरील गळतीचे प्रमाण बरेच जास्त आहे. शहरी भागातील झोपडपट्ट्या, खेळांसाठी मैदानांचा अभाव, वाहतुकीच्या समस्या अशा खास शहरीकरणाच्या समस्यांचाच वेगळा विचार करावा लागतो.

अशा अनेक गोष्टींमुळे शहरी भागातील शिक्षणाचे प्रश्न ग्रामीण भागातील शिक्षणापेक्षा वेगळे होतात. पण राज्यस्तरावरील शैक्षणिक धोरणे सर्वसाधारणपणे ग्रामीण भाग डोळ्यांसमोर ठेवून आखली जातात. ते स्वाभाविकही आहे. शहरी भागाच्या गरजांचा त्यात वेगळा विचार केलेला नसतो. या पुढच्या काळात शहरी भागातील शैक्षणिक समस्यांचा आणि शैक्षणिक गुणवत्तेचा वेगळा विचार करावा लागेल. हे सर्व लक्षात घेऊनच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने नागरी भागातील शैक्षणिक गुणवत्ता कार्यक्रमावर दिनांक ६ फेब्रुवारी २००९ रोजी मुंबई येथे एक कार्यशाळा आयोजित केली.

## कार्यशाळेचे आयोजन

ही कार्यशाळा दिनांक ६ फेब्रुवारी २००९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई; बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बृहन्मुंबई महानगरपालिका सभागृहात आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे उद्‌घाटन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापौर डॉ. शुभा राऊळ यांच्या शुभहस्ते झाले. प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचच्या संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांनी केले. महाराष्ट्राच्या शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे सचिव श्री. संजय कुमार हे कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. जयराज फाटक, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान भूषविले.

## कार्यशाळेत सहभागी झालेले प्रतिनिधी –

या कार्यशाळेत राज्यातील २२ महानगरपालिकांच्या विविध घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तींना निमंत्रित करण्यात आले. यात महानगरपालिकांचे महापौर, महानगरपालिका शिक्षण समित्या किंवा शिक्षण मंडळे यांचे सभापती, महानगर पालिकांचे शिक्षण विषयाचे काम पाहणारे उपायुक्त, महानगर पालिकांचे शिक्षणाधिकारी, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षणविषयक कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी, अपंगांच्या शिक्षणाचे कार्य करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी अशा प्रतिनिधींचा समावेश होता. कार्यशाळेला २७४ प्रतिनिधी उपस्थित होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महापौर डॉ. शुभा राऊळ, पुणे महानगरपालिकेच्या महापौर राजलक्ष्मी भोसले, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर अपर्णा डोके, नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर अंजली भोईर आणि भिवंडी महानगरपालिकेचे महापौर जावेद दळवी, मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे महापौर नरेंद्र मेहता आणि सांगली-कुपवाडा-मिरज महानगरपालिकेचे महापौर मैनुद्दीन बागवान यांच्या उपस्थितीचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.




*कार्यशाळेत बोलताना खा. सुप्रियाताई सुळे*

## कार्यशाळेच्या संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम :

**या कार्यशाळेसाठी**

- महानगरपालिका क्षेत्रात केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे प्रथम, मुंबई यांनी त्यांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे,
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या महानगरपालिका क्षेत्राशी संबंधित आकडेवारीच्या आधारे, आणि
- शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी त्यांच्या कार्यशक्षेत्रातील शैक्षणिक आव्हाने आणि उल्लेखनीय उपक्रम यावर आधारित

असे तीन स्टेटस पेपर्स तयार करुन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानकडे पाठवले होते.

- हे तीनही पेपर्स या कार्यशाळेत सहभागी झालेल्या प्रतिनिधींना वाटण्यात आले. उद्घाटनानंतर या तीनही विषयांवर संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींनी पॉवर पॉईंटवर सादरीकरणे केली.
- यानंतर कार्यशाळेत सहभागी असलेल्या प्रतिनिधींपैकी काहींनी आपले विचार मांडले.
- यानंतर पुढील पाच विषयांवर गटकार्यासाठी कार्यशाळेतील प्रतिनिधी आपापल्या निवडीनुसार पुढील पाचपैकी एका गटात गटकार्यासाठी सहभागी झाले.
  - विद्यार्थी विकास
  - शिक्षकांची भूमिका
  - पालक आणि समाज यांची भूमिका
  - महानगरपालिकांतील प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातील प्रशासकीय आव्हाने, आणि
  - अपंगांचे शिक्षण
- गटकार्याच्या वेळी प्रत्येक गटाने आपापल्या गटासाठी एका प्रतिनिधीची गटकार्यवाहक म्हणून निवड केली होती. गटकार्यवाहकांनी आपापल्या गटाच्या सूचना सादर केल्या.

## कार्यशाळेतील चर्चेसाठी घेतलेले विषय –

या कार्यशाळेत पाच विषयांवर प्रामुख्याने चर्चा झाली

**१) विद्यार्थी विकास** – विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, भावनिक, सामाजिक अशा सर्व अंगांनी विकास, त्यांच्यांत आवश्यक त्या कौशल्यांचा विकास आणि त्यासाठी शालेय वेळापत्रकात त्यांना असलेले स्थान व उपाययोजना या बाबींवर चर्चा झाली. पर्यावरणाच्या ऱ्हासाचा प्रश्न संपूर्ण देशालाच-खरे म्हणजे सर्व जगालाच भेडसावतो आहे. शालेय स्तरापासूनच पर्यावरण जागृतीसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. शैक्षणिक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रांत फार वेगाने प्रगती होत आहे. इंटरनेट, मल्टिमीडिया, संगणक, प्रकल्प पद्धती, स्वयंअध्ययन अशा विविध तंत्रांचा वापर अध्ययन अध्यापन प्रक्रियेत कसा करुन घ्यावा यावरही विचार झाला. जीवन कौशल्यांचे शिक्षण आणि प्राथमिक स्तरापासूनच व्यावसायिक शिक्षणाची अभ्यासक्रमाशी सांगड कशी घालावी यावरही चर्चा झाली. भाषामाध्यमे, विद्यार्थ्यांचा आर्थिक आणि सामाजिक स्तर, विद्यार्थ्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी, विविध अभ्यासक्रमांच्या आणि वेगवेगळ्या अभ्यासक्रमांच्या शाळा यामुळे महानगरपालिका क्षेत्रात कमालीची विविधता आणि विषमता आढळून येते. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकांमधील मुलांना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण कसे द्यायचे हा एक महत्वाचा मुद्दा चर्चेसाठी होता. अनेक महानगरपालिकांनी पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे असलेला ओढा लक्षात घेऊन इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या आहेत. त्यांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणेही गरजेचे होते. गळतीचे शून्य प्रमाण, किमान अध्ययन क्षमता, स्थलांतरित पालकांची मुले, झोपडपट्ट्यांमधील

मुले, इतर वंचित घटकांतील मुले त्यांच्या शिक्षणाचे प्रश्न यांवर विशेषत्वाने विचार झाला.

**२) शिक्षकांची भूमिका –** विद्यार्थी विकासात सर्वात महत्वाची जबाबदारी असते ती शिक्षकांची. त्या दृष्टीने त्यांचे उत्तरदायित्व, शिक्षक संघटनांची भूमिका, शिक्षकांच्या सेवाशर्ती, त्यांचे प्रशिक्षण आणि व्यावसायिक विकास या बाबींवर या गटात चर्चा झाली.

**३) पालक आणि समाज यांची भूमिका –** ग्रामीण भागासारखा शहरी भागात एकजिनसीपणा नसतो. विद्यार्थ्यांचे पालकही त्यांच्या कामाच्या व्यापामुळे शाळेकडे फारसे लक्ष देऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत पालक आणि समाज यांचा सहभाग कसा मिळवता येईल, पालक शिक्षक संघ, प्रभाग शिक्षण समित्या, शालेय व्यवस्थापन समित्या यांची परिणामकारकता कशी वाढवता येईल. शालेय व्यवस्थापन समित्या आणि प्रभाग शिक्षण समित्या यांच्या सदस्यांचे प्रशिक्षण यावर चर्चा झाली. परिसरातील तज्ज्ञ आणि कारागीर यांचा विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन आणि इतर शैक्षणिक उपक्रम यांत सहभाग कसा घ्यावा यावरही चर्चा झाली.

**४) महानगरपालिकांतील प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातील प्रशासकीय आव्हाने –** बृहन्मुंबई महानगरपालिका, पश्चिम महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका आणि विदर्भ व मराठवाडा या भागातील महानगरपालिका यांच्यासाठी वेगवेगळे कायदे लागू आहेत. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ ची अंमलबजावणी १९४९ पासून लागू झाली. त्यानंतर राज्यात प्रचंड प्रमाणात स्थित्यंतरे झाली. या पार्श्वभूमीवर नवीन अधिनियम लागू करण्याबाबत चर्चा झाली. राज्यसभेत मुलांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क विधेयक, २००८ च्या संदर्भात हा मुद्दा फारच महत्त्वाचा ठरतो. त्याचबरोबर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नेमणूका आणि सेवाविषयक प्रश्न यांवरही चर्चा झाली. महानगरपालिका त्यांच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर विविध सुविधा उपलब्ध करुन देतात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि गरजोपयोगी साहित्यही पुरवतात. या सर्व बाबी दर्जेदार कशा असतील आणि त्या विद्यार्थ्यांना वेळेवर कशा उपलब्ध होतील यावर चर्चा झाली. शालेय पोषण आहार योजना आणि सर्व शिक्षा अभियान या दोन अतिशय महत्त्वाच्या योजनांची प्रभावी



*कार्यशाळेत बोलताना बृहन्मुंबईच्या महापौर डॉ. शुभा राऊळ.*

अंमलबजावणी कशी करायची हा चर्चेसाठी महत्वाचा मुद्दा होता.

**५) अपंगांचे शिक्षण–** राज्यात अपंगांच्या शिक्षणासाठी पुढील तीन योजनांची अंमलबजावणी सुरु आहे.

- सामाजिक न्याय विकास विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत सुरु असलेल्या विशेष शाळा,
- शालेय शिक्षणाच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत सुरु असलेली अपंग एकात्मिक शिक्षण योजना आणि
- शालेय शिक्षण विभागाच्या प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत सुरु असलेल्या सर्व शिक्षा अभियानासाठी अंमलबजावणी होत असलेली समावेशित शिक्षण योजना.

या तीन योजनांमध्ये अपंग विद्यार्थ्यांचा सहभाग कसा वाढीला लागेल, या योजनांची परिणामकारकता कशी वाढीला लागेल, या योजनांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे देता येईल यावर चर्चा झाली.

## कार्यशाळेचे फलित

धर्म-जाती पक्षनिरपेक्ष असे व्यासपीठ चर्चा आणि




*कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी व्यासपीठावर (डावीकडून) खा. सुप्रिया सुळे, डॉ. शुभा राऊळ, पिंपरी-चिंचवडच्या महापौर अपर्णा डोके आणि पुण्याच्या महापौर राजलक्ष्मी भोसले*

विचारविनिमय यांच्यासाठी उपलब्ध करुन देण्याच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या भूमिकेला अनुसरुन या कार्यशाळेच्या निमित्ताने महानगरपालिका क्षेत्रातील विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ञ, महानगरपालिका आणि शासनाचे अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी यांचा व्यापक स्वरुपाचा सहभाग मिळाला.

- नागरी क्षेत्रातील प्राथमिक शिक्षण या विषयावर राज्य पातळीवर व्यापक स्वरुपाची चर्चा घडवून आणण्याच्या दृष्टीने आयोजित केलेली राज्यातील बहुधा ही पहिलीच कार्यशाळा असावी.
- शहरी भागातील शिक्षणाच्या प्रश्नांचे स्वरुप अनेक बाबतीत वेगळे असते, त्यामुळे शहरी भागातील शिक्षणाच्या प्रश्नांचा राज्याची शैक्षणिक धोरणे ठरवताना सर्व क्षेत्रांबरोबर एकत्रित विचार करण्याबरोबरच वेगळा विचार करणेही आवश्यक ठरते ही दृष्टी या कार्यशाळेमुळे उपस्थित प्रतिनिधींना मिळाली.
- नागरी क्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाविषयी अनेक महत्वाच्या सूचना या कार्यशाळेत प्राप्त झाल्या. त्यांचा विचार करुन महाराष्ट्र शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शिफारशी पाठविण्यात येतील.
- या कार्यशाळेसाठी गोळा झालेली आकडेवारी, साहित्य, सादरीकरणे यांचा उपयोग करुन एक पुस्तक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत प्रकाशित करण्यात येईल. या पुस्तकाचा उपयोग शहरी भागातील प्राथमिक शिक्षणाशी संबंधित व्यक्तींना संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करता येईल.

■■■



# वेध निवडणुकांचे पण दिवस आव्हानांचे

- विजय नाईक
नवी दिल्ली

**येत्या निवडणुकात काँग्रेस व भारतीय जनता पक्ष या भारतीय राजकारणातील दोन मुख्य प्रवाहांना स्वतःचे स्थान टिकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. मतदारसंघांच्या पुनर्रचनेमुळे अनेक विद्यमान खासदारांचे धाबे दणाणले आहे. अनेकांना मतदारसंघ बदलण्याची वेळ आली असून तिकीट मिळाले, तरी निवडून येण्याची खात्री वाटत नाही. त्यामुळे तिकिटे देताना नव्या चेहऱ्यांच्या, खात्रीने निवडून येणाऱ्या उमेदवारांची निवड करण्याचे कठीण काम राजकीय पक्षांना करावे लागेल.**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. तत्पूर्वी साजरा झालेला गणतंत्र दिन, संसदेत संयुक्त सदनाला उद्देशून राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांनी केलेले अभिभाषण, संसदेत सादर करण्यात आलेला हंगामी रेल्वे अर्थसंकल्प व प्रणब मुकर्जी यांनी सादर केलेला २००९-१० चा अर्थसंकल्प, यातून सरकारच्या गेल्या साडेचार वर्षांचा ताळेबंद मांडण्यात आला. आम आदमी, शेतकरी व गरीब जनता यांच्याबरोबर सरकार आहे, याचा सातत्याने भाषणातून उच्चार करण्यात आला. रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव यांनी प्रवासी भाड्यात वाढ न केल्याने सर्वांना हायसे वाटणे साहजिक. अर्थसंकल्पात कर लादण्यात आलेले नसले, तरी निवडणुकीनंतर येणाऱ्या सरकारला ते 'प्रथम कर्तव्य' करावे लागेल व संभाव्यतः जनतेचा रोषही ओढवून घ्यावा लागेल.

भारतीय जनता पक्षाने वाजपेयी यांच्या कारकिर्दीतील 'शायनिंग इंडिया' चा नारा सोडून दिलाय. 'रायजिंग इंडिया' चा नारा ते देऊ लागलेत. तथापि, या निवडणुकांवर दाट सावट असेल, ते मुंबईवर २६ नोव्हेंबर रोजी दहशतवाद्यांनी केलेले अतिरेकी हल्ले व त्यात झालेल्या मनुष्य व संपत्तीच्या हानीचे, तसेच पाकिस्तानकडून मिळणाऱ्या थंड प्रतिसादाचे. हल्ल्यांनंतर केंद्र सरकारने तात्काळ लष्कर-ए-तैय्यबाच्या पाकव्याप्त काश्मीरमधील तळ-छावण्यांवर हल्ला केला असता, तर कृतीशीलता व निर्धार दिसला असता. पण निवडणुका जवळ असताना युद्ध करणार कसे तसेच, आर्थिक संकट असताना त्याचा काय परिणाम होईल ? निर्णय योग्य ठरेल काय ? असा विचार झाला व युद्ध अथवा सशस्त्र कारवाईचा विचार सोडून द्यावा लागला. परिणामतः शिवराज पाटील, विलासराव देशमुख व आर.आर.पाटील तिन्ही मराठी नेत्यांना पदे सोडावी लागली. पण ज्यांच्याकडे देशाच्या सुरक्षेची सूत्रे आहेत, ते राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एम.के.नारायणन मात्र आपल्या पदावर कायम आहेत. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नारायणन यांचा राजीनामा प्रथम घ्यावयास हवा होता, असे मत असलेला मोठा वर्ग आहे.

हल्ल्यानंतर झालेल्या काँग्रेस नेत्यांच्या बैठकीतील चर्चेदरम्यान पंतप्रधान व संरक्षण मंत्री ए.के.अँथनी यांनी राजीनाम्याची तयारी दर्शविताच शिवराज पाटील यांनी राजीनामा देऊ केला. पण ते म्हणाले, की देशावर पुन्हा हल्ला होऊ नये, याची काळजी आपण घेत असलो, तरी तो पुन्हा होणार नाही, अशी ग्वाही देता येत नाही. सारांश, तसा हल्ला झाल्यास भावी










गृहमंत्र्याला जबाबदार धरु नका. पी.चिदंबरम यांच्याकडे गृहमंत्रीपदाची सूत्रे आल्यापासून कोणतीही दहशतवादी घटना घडलेली नाही, हे देशाचे व त्यांचे सुदैव. अतिरेक्यांचे हल्ले ना वाजपेयी-अडवानी थोपवू शकले, ना संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार. दहशतवाद देशाच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य अंग बनलाय. कोण, कुठे, केव्हा हल्ला करील याची खात्री उरलेली नाही. तो होऊ नये, यासाठी सर्वस्तरावर प्रयत्न करावे लागतील. परंतु कायदा व सुव्यवस्थेची सूत्रे प्रामुख्याने राज्य सरकारच्या हाती असल्याने स्थानीय पोलीस व दहशतविरोधी दले सक्षम होत नाही, तोवर हल्ल्यांची भीती कायम राहील. पाकिस्तान जितका कमकुवत होईल, तितकी भारतावर होणाऱ्या कट्टरवाद्यांच्या हल्ल्यांची शक्यता वाढेल, दरम्यान, मुंबईतील हल्ल्यानंतर केंद्राने राष्ट्रीय चौकशी संघटना (एनआयए-नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी) स्थापन करण्याची घोषणाही केली. त्याबाबत तज्ञांचे म्हणणे असे की ही संघटना घटना घडून गेल्यावर चौकशी सुरु करणार. तथापि, ती घडू नये, यासाठी सरकार, गुप्तचर संघटना कोणते प्रतिबंधक सुरक्षा उपाय योजणार, हे मात्र केंद्र सरकारने स्पष्ट केलेले नाही.

दहशतवादाला निपटून काढण्याचा निर्धार काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी गेल्या महिन्यात रामलीला मैदानात झालेल्या जाहीर सभेत व्यक्त केला. श्रीमती पाटील यांनीही अभिभाषणात त्याचा पुनरुच्चार केला. भारताने पुरावा सादर करूनही पाकिस्तानने केलेली चालढकल, ''अतिरेकी पाकिस्तानमधून आलेच नाही, तर ते युरोप व बांगलादेशातून आले,'' असा केलेला धादांत खोटा प्रचार व नाक दाबल्यानंतर तोंड उघडावे, अशी अमेरिकेने दबाव आणल्यानंतर दिलेली कबुली, यातून पाकिस्तानची विश्वासार्हता पूर्णतः रसातळाला गेली, हे स्पष्ट होते.



राष्ट्राध्यक्ष असीफ अली झरदारी यांच्यापुढे तिहेरी संकट उभे आहे. एकीकडे अतिरेक्यांना मदत करणारे सेनादल व आयएसआय, दुसरीकडे तालिबान व अल कैदाचा दिवसगणिक वाढणारा प्रभाव व अध्यक्ष बराक ओबामा यांच्याकडून येणारा दबाव, यामुळे



त्यांना सीमित पर्याय उरले आहेत. त्यात भर पडली आहे, ती स्वात खोऱ्याबाबत तालिबान व पाकिस्तान दरम्यान झालेला समझोता. तालिबानने १५ फेब्रुवारी २००९ रोजी जाहीर केलेली दहा दिवसांची शस्त्रसंधी कायमची असल्याची घोषणा नुकतीच केली पण स्वात खोऱ्यात लागू करण्यात आलेला शरीया कायद्याकडे पाहाता, पाकिस्तानच्या पायाखालील जमीन वेगाने सरकते आहे, हे सिद्ध होते. स्वातमध्ये पुन्हा केव्हा ठिणगी पडेल, हे सांगणे कठीण. पाकिस्तानचे अध्यक्ष असीफ अली झरदारी यांनी पाकिस्तानचा काही प्रदेश तालिबानच्या ताब्यात गेल्याचे अलीकडे केलेले निवेदन तेथील परिस्थितीचे गांभीर्य दर्शविते. पाकिस्तानची वाटचाल वेगाने अस्थिरतेकडे व संभाव्य विभाजनाकडे चालली आहे. त्याचे दूरगामी परिणाम भारतावर होण्याची शक्यता टाळता येत नाही. येत्या सरकारसाठी ते मोठे आव्हान ठरणार आहे.

स्वात हा पश्चिमोत्तर आदिवासीबहुल प्रांत (नॉर्थवेस्ट फ्रंटियर ट्रायबल एरिया-पार्ट) आहे. त्यास पाकिस्तानचे स्वित्झर्लंड-नंदनवन मानले जायचे. तेथे तालिबान टोळ्यांनी थैमान घालूनही पाकिस्तानी सेना त्यांना आवर घालू शकलेली नाही. गेल्या वर्षभरात ८०० पोलिसांनी तेथून पळ काढला. मोंगीर या शहराच्या मुख्य चौकात ठार केलेल्या पाकिस्तानी पोलिसांची छिन्नविच्छिन्न प्रेतं आणून टाकण्याचे सत्र चालू असल्यानं त्या चौकाला 'चौक झेबाखाना' (माणसांचा कत्तलखाना) व स्वात खोऱ्याला 'मृत्यूची दरी' असे म्हटले जाऊ लागले आहे. जिओ टेलिव्हिजनच्या मूसा खानखेल या पत्रकाराची झालेली निर्घृण हत्या, हे ताजे उदाहरण होय. इस्लामिक शरीया कायदा लागू झाल्याने महिलांची गळचेपी होत असून सुमारे, १७० शाळांवर बाँब टाकून त्या उध्वस्त करण्यात आल्या. स्वात खोऱ्यावर बौद्ध धर्माचा मोठा पगडा आहे. तेथे अनेक बौद्धधर्मीय अवशेष, स्तूप, गुंफा आहेत. अफगाणिस्तानात बामियानमधील बौद्धमूर्तींची तालिबानने जी अवस्था केली तीच या अवशेषांची होणार, अशी भीती राष्ट्रसंघातील वर्तुळातून व्यक्त केली जाते. बराक ओबामा यांचे खास दूत रिचर्ड हॉलब्रुक यांनी पाकिस्तान व अफगाणिस्तानच्या दौऱ्यानंतर १० फेब्रुवारी रोजी भारताला भेट दिली. प्रणब मुकर्जी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी भारत, अमेरिका व पाकिस्तानसाठी तालिबान हा फार मोठा शत्रू असल्याचे सांगितले. परंतु, अल कैदा व तालिबानला नेस्तनाबूत कसे करायचे, याचे उत्तर अमेरिका व पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांकडे नाही. ओबामा यांनी अफगाणिस्तानमध्ये आणखी १७ हजार सैनिक पाठविण्याचा निर्णय घेतल्याने येत्या काही महिन्यात तेथील गुणात्मक फरक पडणार काय, हे पाहावयाचे.

दरम्यान दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी केंद्र



सरकार नेमकी काय व्यूहरचना करणार, याच्या प्रतिक्षेत देश आहे. हल्ल्याच्या एका घटनेपासून दुसऱ्या घटनेकडे सरकण्यापेक्षा आपण काही करु शकत नाही, असे निर्माण झालेले चित्र चिंताजनक होय.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर लोकसभेत १७ व १८ फेब्रुवारी रोजी झालेल्या चर्चेला उत्तर देताना परराष्ट्र मंत्री प्रणब मुकर्जी यांनी भारतीय शिष्टाई सफल झाल्याचे सांगितले व पाकिस्तानविरुद्ध युद्ध लादण्यास पुन्हा नकार दिला. अमेरिकेचे नाव न घेता ते म्हणाले, भारताने पॅनिक बटन दाबले नाही, सीमेवर सुरुंग पेरले नाही, की सेनेला सक्रिय केले नाही, परंतु पाकिस्तानने आपल्या भूमीचा दहशतवादासाठी होणारा वापर पूर्णपणे थांबविला पाहिजे, व तळछावण्या बंद केल्या पाहिजे. त्याचा विश्‍वासार्ह व दृश्य पुरावा भारताला व जगाला दिला पाहिजे. ''बांगला देशातून घुसखोरी होऊ नये, यासाठी सीमेवर कुंपण बांधण्याचे काम सुरु आहे. बांगला देशाला लागून असलेल्या ४०९६ कि. मी. च्या सीमेला पूर्णपणे अभेद्य करणे कठीण आहे,'' असे सांगून त्यांनी बांगला देशातून बेकायदेशीररित्या आलेल्या एक लाख लोकांना पुन्हा परत पाठविण्याचे काम हाती घेण्यात आल्याची माहिती दिली. संसदेच्या अधिवेशनात खासदारांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली.

दरम्यान, सार्वत्रिक निवडणुकीच्या दिशेने राजकारण सरकतेय, तसे राजकीय पक्षांचे हेवेदावे, जागावाटप, समझोत्यासाठी चाललेली रस्सीखेच, उलटसुलट निवेदने सुरु आहेत. त्यावरुन निवडणूक चुरशीची व अत्यंत अटीतटीच्या होणार यात शंका उरत नाही. गेल्या नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये झालेल्या दिल्ली, मध्यप्रदेश, राजस्तान, छत्तीसगढ, मिझोराम व जम्मु व काश्मीर या सहा राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांचे निकाल संमिश्र होते. मुंबईतील दहशतवादी हल्ला, अर्थव्यवस्थेवर आलेले संकट या दोन्ही घटनांचा जनमानसावर परिणाम झाला. तथापि, त्याचे प्रतिबिंब तीव्रपणे मतपेटीत पडले नाही. लोकसभेच्या निवडणुकीत व डीझेलच्या किमतीत केलेली कपात, सहाव्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीने सरकारी व सेनादलांना झालेला लाभ, १३ टक्क्यांवरुन चार टक्क्यांवर आलेली करवाढ पाहाता, निवडणुकीपूर्वी काँग्रेस व संयुक्त पुरोगामी आघाडीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होईल.

लोकसभेच्या किती जागा पक्षाला मिळणार, असे विचारता नागरीविकास मंत्री जयपाल रेड्डी यांनी १६० ते १८० जागांचा अंदाज वर्तविला. भारतीय जनता पक्षाचे नेतेही तितकाच दावा करतात. परंतु दोन्ही पक्ष प्रत्येकी किमान दीडशे जागा मिळाव्या, असे शर्थीचे प्रयत्न करणार. ज्या पक्षाकडे जागा जास्त, त्यास सरकार बनविण्याचे आमंत्रण राष्ट्रपती देऊ शकतात. परंतु संबंधित राजकीय पक्षाला मिळणारा पाठिंबा व स्थिरता याबाबत राष्ट्रपतींना खात्री करुन घ्यावी लागेल. पंतप्रधानांच्या रिंगणात काँग्रेसचे मनमोहन सिंग, भाजपचे लालकृष्ण अडवानी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, बहुजन समाज पक्षाच्या मायावती यांच्या नावाची चर्चा आहे. राहुल गांधी यांचे नाव सध्या तरी सोनिया गांधी यांनी पुढे केलेले नाही. काँग्रेसने संपुआमधील कोणत्याही सहकारी पक्षाबरोबर निवडणूकपूर्व समझोता न करण्याचे ठरविल्याने सहकारी पक्ष अन्य राजकीय पक्षांबरोबर समझोते करण्यास मुक्त आहेत. याचा अर्थ, सार्वत्रिक निवडणुकीत स्थानिक पातळीवर झालेले



समझोते निवडणुकीनंतरही टिकतीलच, असे मानता येणार नाही. निवडणुकीपूर्वी व निवडणुकीनंतर ही राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी निवडणूकपूर्व काँग्रेसबरोबर जागावाटपासाठी समझोता करण्यास चाचपणी केली. तथापि, त्यांना योग्य प्रतिसाद न मिळाल्याने त्यांचे शिवसेना तसेच मुलायमसिंग यादव यांच्या समाजवादी पक्षाबरोबर समझोता करण्याचे मार्गही खुले झाले. भारतीय जनता पक्षाला सोडून कोणाशीही युती करण्याचा संकेत त्यांनी १८ फेब्रुवारी रोजी सांगली येथे दिला. समाजवादी पक्षाबरोबर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले, पण ''जागावाटपाबाबत आम्ही निर्णय घेतलेला नाही,'' असे ते म्हणाले, पवार यांच्या वक्तव्याने काँग्रेसमध्ये चलबिचल झाली नाही, तरच नवल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात शिवसेना व राष्ट्रवादी यांचा काही जागांवर समझोता झाल्यास भारतीय जनता पक्षाला चांगलाच फटका बसेल.

महाराष्ट्रात भाजप नेहमीच शिवसेनेच्या मदतीने राजकारण करीत आला आहे. शिवसेनेच्या पाठिंब्याशिवाय भाजपचे सरकार केंद्रात स्थापन करण्याच्या प्रयत्नांना यश येण्याची शक्यता कमी. म्हणूनच दोन्ही पक्षात सलोखा राहावा, यासाठी भाजपचे केंद्रीय नेते शेवटपर्यंत सक्रीय राहातील. महाराष्ट्रातील प्रचारसूत्रे लालकृष्ण अडवानी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे सोपविली असली, तरी नितिन गडकरी, गोपिनाथ मुंडे प्रभृतींमध्ये एकी नाही, तोवर भाजपला महाराष्ट्रात लक्षणीय यश मिळणे कठीण.

केंद्रीय पातळीवरील भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. मुरली मनोहर जोशी हे अडवानी, राजनाथ सिंग, अरुण जेटली आदी नेत्यांबाबत अतिशय कडवटपणे बोलतात. अलीकडे 'अडवानी फॉर पीएम' अशी जाहिराती पाकिस्तानमधील वृतपत्रांच्या संकेतस्थळावर झळकल्या. त्याबाबत विचारता डॉ. जोशी उपरोधिकपणे म्हणाले, ''ते केवळ भारतातच नव्हे, पाकिस्तानमध्येही किती लोकप्रिय आहेत, हे दाखविण्याचा हेतू त्यामागे असावा. शिवाय त्यांची जन्मभूमीही पाकिस्तानातील, म्हणूनही त्यांनी जाहीरात दिली असावी.'' ते म्हणाले, ''भाजपमध्ये अडवानी यांच्याव्यतिरिक्त राजनाथ सिंग, अरुण जेटली यांचाही डोळा पंतप्रधानाच्या पदावर आहे.'' माजी उपराष्ट्रपती भैरोसिंग शेखावतही आपली हॅट अधून मधून रिंगणात फेकतात. भाजपने नागपूर येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत मंदिर बांधण्याची घोषणा करीत हुकमी एक्का बाहेर काढला.





त्यावर जोशी म्हणाले, ''रामलालाचे मंदिर तेथे आहे, त्याला कुणीही हलवू शकणार नाही. परंतु तो मुद्दा प्रचारात उगाळून मते मिळणार नाहीत. कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेतृत्वाखाली केंद्रात येणारे संभाव्य सरकार हे संमिश्र अथवा आघाडीचेच असेल. वाजपेयी यांच्या कारकीर्दीत राम मंदिर, समान नागरी संहिता व जम्मू काश्मीरसाठी लागू असलेले घटनेतील ३७० वे कलम रद्द करणे, या तिन्ही मागण्या आम्हाला सोडून द्याव्या लागल्या होत्या, हे पक्षाला ध्यानात ठेवावे लागेल.''

गुजरात, मध्यप्रदेश, हिमाचल, छत्तीसगड या राज्यात भाजपची सरकारे आहेत. बिहारमध्ये जनता दल व त्यांचे संयुक्त सरकार आहे. कर्नाटकात भाजपची झालेली सरशी दक्षिणेत राजकीय प्रभाव वाढविण्यास भाजपला लाभदायक ठरावी. दुसरीकडे दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला लोकसभेच्या सातपैकी किमान पाच जागा मिळण्याची खात्री वाटते. केरळात मार्क्सवादी पक्षाच्या नेत्यात गेली काही महिने चाललेली रस्सीखेच व शिगेला पोहोचलेले मतभेद काँग्रेस आघाडीला लाभदायक ठरतील. आंध्रप्रदेशात काँग्रेसपुढे चिरंजीवी, तेलंगणा राष्ट्र समितीची आव्हाने आहेत.

श्रीलंकेच्या मुद्द्यावरुन द्रमुक व काँग्रेस यांच्यातील मतभेदाचे तीव्र दर्शन १८ व १९ फेब्रुवारी रोजी संसदेत झाले. मरुमलाचीं द्रमुक, पट्टली मक्कल काची या पक्षांनीही सरकारला फैलावर घेतले. तथापि, काँग्रेस व द्रमुकचे सहकार्य कायम असल्याची व त्यांच्याबरोबर पक्ष निवडणूक लढविणार असल्याचे काँग्रेसचे प्रवक्ते शकील अहमद यांनी २० फेब्रुवारी रोजी पत्रकारांना सांगितले. हा विश्वास किती टिकणार, हे येत्या काही दिवसात दिसून येईल. आण्णाद्रमुकच्या अध्यक्ष जयललिता यांनी काँग्रेसबरोबर राजकीय जवळीक साधण्याचा प्रयत्न अलीकडे केला. परंतु त्यांना वाटाण्याच्या अक्षता दाखविण्यात आल्या. दुसरीकडे तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांच्याबरोबर पश्चिम बंगालमध्ये समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न काँग्रेसतर्फे सुरु असल्याने भाजपच्या नेत्यांना चिंता वाटणे साहजिक. समविचारी पक्षांना एकत्र करणेही भाजपसाठी तितके सोपे नाही. तेलगू देसमचे नेते चंद्रबाबू नायडू यांनीही भाजपबरोबर काडीमोड जाहीर केला. ते पाहाता राजकीय पक्ष निवडणूकपूर्व समझोत्यांऐवजी निवडणुकीनंतरच्या समझोत्यांवर भर देतील. परिणामतः मतविभागणी अटळ आहे. आसाम, हरियानात काँग्रेसची सरकारे असल्याने तेथील मतदार काँग्रेसच्या दिशेने झुकण्याची शक्यता अधिक.



राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या काळात वाजपेयी यांनी घेतलेला अणुचाचणीचा निर्णय व कारगिलमध्ये झालेली सरशी, याचे भांडवल आजही भाजप करीत आहे. त्यांचा उच्चार भाजपचे अध्यक्ष राजनाथ सिंग यांनी अलीकडे नागपूर येथे झालेल्या पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत केला होता. भारत व अमेरिका दरम्यान झालेला नागरी अणुऊर्जा कराराचा मुद्दा प्रचारात असेल. तसेच गेली पाच वर्षे काँग्रेसने दिलेल्या स्थिर सरकारचा मुद्दा महत्वाचा ठरेल. समाजवादी पक्षाने पुन्हा एकदा अभिनेत्यांना तिकिटाचे अमीष दाखवित मते खेचण्याचे राजकारण चालविले आहे. मुन्नाभाई उर्फ संजय दत्त हा त्यांच्या गळाला लागलेला मोठा मासा. काँग्रेसने भारतीय क्रिकेट संघाचा माजी कप्तान अझरउद्दीन तर भाजपने शत्रुघ्न सिन्हा यांना तिकिटे देण्याचे ठरवून युवकांमध्ये लोकप्रियता वाढविण्याचा प्रयत्न चालविला आहे.

राजकीय अंदाजानुसार डाव्या आघाडीच्या विद्यमान लोकसभेतील एकूण ६२ जागा ४० पर्यंत खाली येण्याची शक्यता असून, पश्चिम बंगाल व केरळ या दोन राज्यात त्यांना सर्वाधिक फटका बसेल. तृणमूल काँग्रेस, काँग्रेस व भाजप या तीन पक्षांचे आव्हान डाव्या आघाडीमुळे असेल. बिहारमध्ये लालू प्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल व रामविलास पासवान यांचा लोक जनशक्ती पक्ष व काँग्रेस यांच्या दरम्यान काय समझोता होणार, ते लौकरच स्पष्ट होईल. बहुजन समाजपक्षाच्या अध्यक्षा व उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री मायावती यांच्या राजकीय खेळीवर बऱ्याच गोष्टी अवलंबून राहातील. विधानसभेच्या निवडणुकात त्यांना मिळालेल्या हुकमी बहुमतचे दर्शन लोकसभेच्या मतदानात पडणार काय, याचा अंदाज आज करणे कठीण. तथापि, प्रत्येक राज्यात असलेले स्थानीय पक्ष (शिवसेना, रिपब्लिकन, अकाली, अजित सिंग, उमा भारती) यांच्या भूमिकांचाही संभाव्य सरकारच्या जडणघडणीवर परिणाम होईल. येत्या निवडणुकात काँग्रेस व भारतीय जनता पक्ष या भारतीय राजकारणातील दोन मुख्य प्रवाहांना स्वतःचे स्थान टिकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. मतदारसंघांच्या पुनर्रचनेमुळे अनेक विद्यमान खासदारांचे धाबे दणाणले आहे. अनेकांना मतदारसंघ बदलण्याची वेळ आली असून तिकीट मिळाले, तरी निवडून येण्याची खात्री वाटत नाही. त्यामुळे तिकिटे देताना नव्या चेहऱ्यांच्या, खात्रीने निवडून येणाऱ्या उमेदवारांची निवड करण्याचे कठीण काम राजकीय पक्षांना करावे लागेल.

■■■



- आर. आर. पाटील
प्रदेशाध्यक्ष,
राष्ट्रवादी काँग्रेस

# शहाजोग अडवानींचे मानभावी 'ब्लॉग'

**सामाजिक सामंजस्य व राष्ट्रीय एकात्मतेच्या रक्षणापेक्षा अडवानींचे पंतप्रधानपदाचे डोहाळे पुरविणेच अधिक महत्त्वाचे वाटत असल्यामुळे अयोध्या प्रश्नाच्या शिळ्या कढीला पुन्हा एकवार ऊत आणण्याचा निंद्य प्रयत्न त्या पक्षाकडून जाणीवपूर्वक केला जात आहे. तो हाणून पाडण्यासाठी सर्व धर्मनिरपेक्ष, पुरोगामी राष्ट्रवादी पक्ष व संघटनांनी आपली सर्व ताकद पणाला लावून एकजुटीने उभे राहाणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. ती पूर्ण झाली तर अडवानींनी कितीही 'ब्लॉग' पाठविले तरी त्यांच्यावरील 'मुस्लीमद्वेष्टा' हा 'ब्लॉट' तर पुसला जाणार नाहीच.**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (ही आघाडी सध्या कितपत अस्तित्वात आहे आणि फुटकळ प्रादेशिक पक्षांची त्यात काही वध-घट झालीय का, हा प्रश्नच आहे) पंतप्रधानपदाचे उमेदवार लालकृष्ण अडवानी तसा गेली बरीच काळ आपली प्रतिमा सुधारण्याच्या, उंचावण्याच्या प्रयत्नांत आहेत. 'कडवा हिंदुत्त्वनिष्ठ' आणि 'अल्पसंख्यांकांचा (मुस्लीमांचा) विरोधक' ही 'लेबले' १९९० च्या दशकात सर्वच दृष्ट्या सोयीची होती. तेव्हा अडवानींनी मोठ्या अभिमानाने मिरवली आणि 'भाजपचे सरदार पटेल' म्हणून स्वतःचा गाजावाजा करून घेतला. परंतु पुढे अगदी अनपेक्षितपणे राज्यकर्ते म्हणून वावरण्याची संधी मिळाली तेव्हा मात्र 'भाजपचे उदारमनःस्क जवाहर' अटलबिहारी वाजपेयी यांच्या तुलनेत लोकप्रियता आणि व्यापक जनाधार या दोन्ही बाबतीत आपण खूपच मागे आहोत, किंबहुना आपल्याकडे सर्वसामान्य भारतीय जनता पाहाते ते पुराणप्रिय, कर्मठ व प्रतिगामी वृत्तीचा नेता म्हणूनच हे त्यांच्या लक्षात आले.

या देशाचे सर्वोच्च सत्तास्थान- पंतप्रधानपद- मिळविण्याचे स्वप्न अडवानी किमान गेली दीड-दोन दशके तरी अगदी असोशीने पाहात आहेत. अर्थात अटलजी राजकारणात सक्रिय आहेत तोवर हे स्वप्न पूर्ण होणे सर्वथा अशक्य आहे, याची पूर्ण कल्पना असल्यामुळे हा सर्व काळ त्यानी 'नंबर २ चे नेते' म्हणूनच व्यतीत केला, परंतु २००४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीची पिछेहाट झाल्यानंतर वाजपेयींनी 'बॅंक बेंचर'ची भूमिका स्विकारली आणि मग साहजिकच सत्तापदाच्या नव्या शर्यतीत अडवानी 'फ्रंट रनर' बनले.

पाच वर्षांपूर्वी ही खांदेपालट झाल्यानंतर प्रारंभीचा काही काळ तरी हा अनुभवसंपन्न मुत्सद्दी नेता तसा चांगल्या 'फॉर्म'मध्ये होता. लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद म्हणजे 'शॅडो प्राइम मिनिस्टरशीपच'! ती मिळाल्यामुळे आता पंतप्रधानपद मिळविणे अजिबात अवघड नाही, अशी अडवानींची समजूत होती. लोकसभेतील सर्वसाधारण निसरडे पक्षीय बलाबल आणि पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारची एकूण 'तोळामासा' प्रकृती लक्षात घेता हे सरकार फार काळ टिकणार नाही, अशी त्यांना खात्रीच होती. परंतु कसचे काय न् काय! प्रथम डाव्या पक्षांच्या सशर्त पाठिंब्याच्या बळावर आणि अमेरिकेशी नागरी अणुसहकार्य करार करण्याचे धाडसी पाऊल उचलल्यानंतर त्याच्या पाठिंब्याशिवायही मनमोहनसिंग सरकारने आपली पाच वर्षांची मुदत आरामात पूर्ण केली आहे. त्या सरकारचे हे यश म्हणजे अडवानींसाठी घोर अपेक्षाभंगच आहे... परंतु हा खारावलेला राजकारणी त्यामुळे खचलेला मात्र नाही, हे निश्चित.

आता आगामी निवडणुकीत काँग्रेस व मित्रपक्षांचा पराभव करून पुन्हा एकवार केंद्रीय सत्ता काबिज करण्याची उमेद अडवानी व त्यांचे सहकारी बाळगून आहेत. ही उमेद टिकवायची आणि वाढवायची तर अर्थातच अडवानींना आपली एक नवी, उदारमतवादाकडे झुकणारी आकर्षक प्रतिमा तयार करणे जरुरीचे आहे. त्या दृष्टीने आखण्यात आलेल्या 'स्ट्रॅटेजी'चा एक भाग म्हणून काही काळापूर्वी त्यांनी स्वतःची 'वेबसाइट' सुरू केली. परंतु केवळ देशाच्या नव्हे तर साऱ्या जगाच्या कानाकोपऱ्यात पोचण्यासाठी ती पुरेशी ठरणार नाही म्हणून की काय, नुकताच त्यांनी स्वतःचा 'ब्लॉग' ही सुरू केला आहे. ही 'वेबसाइट' व 'ब्लॉग' वरून दरदिनी अडवानींची नवनवी छायाचित्रे व निवडणुकीच्या निमित्ताने आखण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची साद्यंत माहिती तर प्रसिद्ध होतेच परंतु ताज्या राजकीय घडामोडींविषयीची त्यांची मते आणि मतदारांबरोबरची प्रश्नोत्तरेही प्रसारित केली जातात. वयाची ऐंशी पार केलेला हा वयोवृद्ध नेता बदलत्या काळाचे भान राखणारा असल्याचे तर या नव्या उपक्रमातून सिद्ध होऊ पाहातआहेच पण नव्या, आधुनिक पिढीशी थेट संवाद साधण्याचे त्यांचे कौशल्यही त्यातून प्रकट होत आहे.

अर्थात ही 'वेबसाइट' आणि 'ब्लॉग' हे अडवानींचे 'दाखवायचे दात' असले तरी त्यांचे 'खायचे दात' वेगळेच आहेत, हे वेगळे सांगायला लागू नये. गेली पाच दशकांहून अधिक काळ राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी असलेला हा नेता आता कालमानानुरुप नवे तंत्र-मंत्र आत्मसात करून जनतेसमोर येत असला तरी त्यांचा तो जुनापुराणा 'हिंदुत्त्वाचा बाणा' आणि धर्म व जातीच्या आधारे देशात अशांतता व अस्थिरता माजविण्याचे दळभद्री राजकारण आजही कायम आहे, हे मात्र विसरून चालणार नाही.

अडवानींच्या या दुटप्पी चालीचा पुरावा म्हणून त्यांच्या एका ताज्या 'ब्लॉग'चा निर्देश करावा लागेल. या 'ब्लॉग' मध्ये त्यांनी १९९० मध्ये काढलेल्या आपल्या 'अयोध्या रथ यात्रे'चा उल्लेख केला असून, ती यात्रा मुस्लीमांच्या विरोधात होती, असे आपल्याला वाटते का, असा प्रश्न मतदारांना विचारला आहे. विशेष म्हणजे हा प्रश्न विचारून ते थांबलेले नाहीत तर त्याचे उत्तरही त्यांनी 'नाही, कदापि नाही', असे



स्वतःच देऊन टाकले आहे. अयोध्येतील वादग्रस्त जागी श्रीरामाचे भव्य मंदिर उभारण्याचा भाजपचा अट्टाहास, त्या अट्टाहासापोटी बाबरी मशीद उध्वस्त करण्याचे तडीस नेले गेलेले कारस्थान आणि त्याची परिणती म्हणून नंतरच्या काळात साऱ्या देशभर उसळलेला हिंसाचार या साऱ्या-साऱ्याचे सूत्रधार केवळ आणि केवळ अडवानी हेच होते, हा इतिहास आहे. गेली वीस वर्षे हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्याबद्दल कोणालाच काही शासन झालेले नसले तरी स्वतंत्र भारताच्या इतिहसातील ते एक 'लाजिरवाणे पर्व' आहे, याबद्दल कोणाच्याही मनात तिळमात्रही शंका नाही.

अटलबिहारी वाजपेयींचा एकमेव सन्मान्य अपवाद वगळला तर अडवानींसह भाजपच्या बहुतेक सर्व ज्येष्ठ नेत्यांनी या नव्या 'अयोध्या कांडा'बद्दल वेळोवेळी अभिमान व आनंदाचीच भावना बोलून दाखविली आहे आणि 'मंदिर वही बनाएँगे'च्या बरोबरीने 'तीन नहीं तीन हजार, नहीं रहेंगी एक मझार' असे नारेही दिले आहेत. विशेष म्हणजे आता अडवानींजी आपण त्या गांवचेच नाही असे मोठ्या शहाजोगपणे भासवू पाहात असले तरी भाजपच्या कार्यक्रम पत्रिकेत आजही देशापुढील अनेकानेक महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीस नव्हे तर 'मंदिर निर्माण'सच सर्वाधिक महत्त्वाचे स्थान आहे असे दिसते.

गेल्या महिन्यात नागपुरमध्ये त्या पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची जी बैठक झाली त्यात पक्षाध्यक्ष राजनाथसिंह... (आणि अडवानींनीही)... यांनी 'केंद्रात स्वबळावर सत्तेवर आलो तर अयोध्येत श्रीराम मंदिर उभारण्याचे काम विनाविलंब पूर्ण केले जाईल', अशी घोषणाच करून टाकली आहे. आपल्या आक्रस्ताळी घोषणेमुळे जातीय सामंजस्याची भावना वाढून राष्ट्रैक्य मजबूत होईल, अशी या महोदयांची कल्पना आहे किंवा काय, हे कळायला मार्ग नाही..., परंतु या घोषणेमुळे देशातील तमाम हिंदू-बांधव आपल्या पाठिशी उभे राहतील, अशी त्यांची अटकळ आहे, हे मात्र कोणाच्याही लक्षात येईल. अर्थात धार्मिक व जातीय भावनांचे भांडवल करून आपले राजकारण साधू पाहाणाऱ्या या धूर्त-लबाडांची अटकळ काहीही असली तरी त्यांच्या भावनिक आवाहनांना यापुढे या देशात काही प्रतिसाद मिळेल, अशी सुतराम शक्यता नाही. मंदिर प्रश्नांच्या मुद्द्यावर निवडणुका लढवून भाजप नेत्यांनी केंद्रातील सत्ता १९९९ ते २००४ या काळात भोगली



असली तरी त्यानंतर दोन-तीन राज्ये वगळता साऱ्या देशभरातच त्यांची जबर पिछेहाट झाली. ही वस्तुस्थिती आहे. विशेष म्हणजे त्याची कल्पना असतांनाही अडवानींनी 'गुजरातचे वादग्रस्त' मुख्यमंत्री व भाजपचे 'हिंदुहृदयसम्राट' नरेंद्र मोदी यांना पक्षाच्या प्रचार मोहिमेत सर्वाधिक महत्त्वाचे स्थान बहाल केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्रासह पश्चिम भारतातील सर्व राज्यांमध्ये मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपची प्रचार यंत्रणा काम करणार आहे. अर्थात भाजपची प्रचार सूत्रे कोणाच्या हाती असावीत हा त्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे. परंतु हिटलर-गोबेल्ससारख्या 'मौत का सौदागरां'शी ज्यांची तुलना केली जाते. त्या नरेंद्र मोदीमहाशयांचा त्यात 'वरचष्मा' राहणार, एवढी एक गोष्टसुद्धा त्या पक्षाचा 'खरा चेहेरा' उजेडात आणण्यास पुरेशी आहे. त्यामुळे तो लपविण्यासाठी अडवानींनी कितीही आटापिटा केला आणि आपली रथयात्रा देशातील मुस्लीमांच्या विरोधात कधीच नव्हती, असा निर्वाळा देणारे 'ब्लॉग' दरदिनी प्रसारित केले तरी त्यास कोणीही सुजाण व्यक्ती कदापि फसणार नाही. खरे पाहाता, नव्या निवडणुकांना सामोरे जाताना स्वतःला राष्ट्रनिष्ठ म्हणविणाऱ्या या पक्षाने काही नवीन विधायक - प्रगतीकारक कार्यक्रमांची कांस धरणे अपेक्षित होते, परंतु सामाजिक सामंजस्य व राष्ट्रीय एकात्मतेच्या रक्षणापेक्षा अडवानींचे पंतप्रधानपदाचे डोहाळे पुरविणेच अधिक महत्त्वाचे वाटत असल्यामुळे अयोध्या प्रश्नाच्या शिळ्या कढीला पुन्हा एकवार ऊत आणण्याचा निंद्य प्रयत्न त्या पक्षाकडून जाणीवपूर्वक केला जात आहे. तो हाणून पाडण्यासाठी सर्व धर्मनिरपेक्ष, पुरोगामी राष्ट्रवादी पक्ष व संघटनांनी आपली सर्व ताकद पणाला लावून एकजुटीने उभे राहाणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. ती पूर्ण झाली तर अडवानींनी कितीही 'ब्लॉग' पाठविले तरी त्यांच्यावरील 'मुस्लीमद्वेष्टा' हा 'ब्लॉट' तर पुसला जाणार नाहीच, परंतु देशाच्या सत्तासूत्रे काबिज करण्याचे ते व त्यांच्या सहकाऱ्यांचे मतलबी मनसुबेही आपोआप उधळले जातील.

■■■



# "हे वाचाळ वाचीवीरांचे 'राज'कारण आता रोखलेच पाहिजे"

## - दिनकर तावडे

### चिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस

**महाराष्ट्राचेच नव्हे तर साऱ्या देशाचे सर्वप्रिय नेते शरद पवार यांच्या विषयी संधी मिळेल तेव्हा अनादर व कुचेष्टेने बोलणे, ही राज ठाकरे यांची आता जणू 'खासियतच' होऊन बसली आहे. वय-अनुभव-अभ्यास आणि एकूण कार्य अशा सर्वच बाबतीत साहेबांच्या पासंगालाही न पुरणाऱ्या या युवा नेत्यास त्याची 'योग्य जागा' दाखविणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पोरा-सोरांच्या वाह्यात बोलण्यास काय महत्व द्यायचं' असे म्हणून आपण या जबाबदारीकडे दुर्लक्ष केले तर मात्र माकडाच्या हातातील कोलिताच्या झळा आणि ज्वाळा राज्याच्या साऱ्या विवेकी राजकारणासच लागण्याचा धोका आहे....**

सार्वत्रिक निवडणुका जवळ आल्यामुळे की काय सध्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे एकच एक नेते राज ठाकरे यांचे पत्रकारमित्रांना भेटणे आणि काही तरी वावदुक-वाह्यात बोलून सवंग प्रसिद्धी मिळविणे, याला चांगलाच जोर आला आहे. गेल्या महिन्यात शिवसेनाप्रमुखांचे अधिकृत राजकीय वारसदार व शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी राजधानी दिल्लीत महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी काही 'गुफ्तगु' केल्याचे वृत्त सर्वदूर झळकले आणि मग आपले वाक्‌गटार मोकळे करण्यास राजना आयतेच निमित्त मिळाले. उद्धव व पवारसाहेबांच्या त्या तथाकथित गुप्त भेटीवर टीप्पणी करतांना या महाशयांनी पवारसाहेबांचा उल्लेख ''धोकायंत्र'' अशा हीन शब्दात केला. आता या शब्दातून त्यांना काय सुचवायचंय, हे त्यांचे त्यांनाच माहित ! परंतु ''भावी पंतप्रधान'' म्हणून केवळ महाराष्ट्रात नाही तर देशाच्या अन्य भागातही ज्यांच्याकडे मोठ्या आदराने पाहिले जाते, त्या पवारसाहेबांचा उल्लेख कोणी लुंग्यासुंग्याने अशा अवमानकारक पद्धतीने करणे केवळ पोरकटपणाचे नाही तर संतापजनकही आहे.

अर्थात साहेबांसारख्या कृतीशूराविषयी या वाचाळ वाचीवीराने असे काही वाह्यात बोलावे यात नवीन व आश्चर्यकारक म्हणावे असे मात्र काहीही नाही. पक्ष नेतृत्वाची गादी आपल्याऐवजी उद्धवजींकडे गेल्यानंतर 'भाऊबंदकी'चे विधुळवाढे राजकारण खेळून शिवसेनेचा त्याग करणारा हा युवानेता त्यावेळी नव्या राजकीय घरोब्यासाठी 'राष्ट्रवादी'चे उंबरे झिजवत होता, हे सर्वचजण जाणतात. परंतु बाळासाहेबांबरोबरच्या वैयक्तिक मैत्रीला स्मरुन तेव्हा पवारसाहेबांना ठाकरे कुटुंबाच्या अंतर्गत वादात पडण्याचे व राजला राष्ट्रवादीत आश्रय देण्याचे साफ टाळले. त्याचा राग मनात असल्यामुळेच पुढे संधी मिळाली तेव्हा प्रत्येकवेळी या चिरंजीवांनी साहेबांविषयी कुत्सित 'बाइटस्' टाकण्याचे जणू व्रतच घेतले आहे. या व्रतामुळे पवारविरोधकांकडून त्यांनी भरपूर प्रसिद्धी तर मिळतेच परंतु आपण साहेबांपेक्षा फार तडफदार व खरे 'महाराष्ट्रनिष्ठ' असल्याचा आव आणून जनसामान्यांची दिशाभूलही करता येते.

खरे पाहता, पवारसाहेबांची जेवढी राजकीय कारकिर्द आहे तेवढे वयही नसलेल्या या 'लिलीपट्टुने' असे औद्धत्य करणे म्हणजे एखाद्या परप्रकाशी पणतीने स्वयंप्रकाशी सर्वशक्तीमान सूर्याला हिणवू पाहाण्याइतके हास्यास्पद आहे - परंतु आपल्याकडे लोकशाही व आचार-विचार-उच्चार स्वातंत्र्याचा अर्थ कोणीही उठावे आणि स्वतःच्या लायकीचा विचार न करता कोणासही



आव्हान द्यावे, असाच रुढ झाला आहे आणि त्यामुळेच राजसाहेबांसारख्या उपटसुंभांचे फावत चाचले आहे. खरे तर पवारसाहेबांसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त बुजुर्गासंबंधात काहीही बरे-वाईट बोलण्यापूर्वी त्यांनी खुद्द आपल्या परमपुज्य काकांची- बाळासाहेबांची- भूमिका समजून घेतली तरी बरेच अनर्थ टळतील. बाळासाहेबांचा उल्लेख मध्यंतरी या पराक्रमी (?) पुतण्याने 'माझा विठ्ठल, माझा पांडुरंग' अशा भावपूर्ण शब्दात केला होता आणि आपला विरोध विठ्ठलास नाही तर त्यास वेढा घालून बसलेल्या 'बडव्यांना' (हे अर्थातच उद्धवजींना उद्देशून!) असल्याची मखलाशीही केली होती. पंतप्रधानपदाच्या शर्यतीत असलेल्या पवारसाहेबांना आपल्या 'विठ्ठलाचा' पूर्ण आशीर्वाद आहे, हे या भक्त राजास अद्याप कळले नसेल तर ते त्याचे घोर अज्ञानच म्हटले पाहिजे.

अहो, बाळासाहेब आणि त्यांची शिवसेना हे फार पूर्वीपासून भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे मुख्य घटक आहेत आणि या आघाडीने 'पंतप्रधानपदाचे उमेदवार' म्हणून वयोवृद्ध नेते लालकृष्ण अडवानी यांच्या नावाची घोषणाही केली आहे. परंतु असे असतांनाही शरद पवारांसारख्या मराठी नेत्यास देशाचे पंतप्रधानपद भूषविण्याची संधी मिळणार असेल तर माझा व शिवसेनेचा पाठिंबा त्यांनाच राहील,'' अशी ग्वाही बाळासाहेबांनी नुकतीच पुन्हा एकवार दिली आहे. अर्थात जे बाळासाहेबांना कळते ते राजला कळू नये, यांत आश्चर्य तरी काय म्हणा ? बाळासाहेबांकडे राज्याच्याच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणाचा गेल्या तब्बल पाच दशकांचा अनुभव, अभ्यास व दूरदृष्टी आहे आणि त्यामुळेच राजकीय प्रतिस्पर्धी असूनही ते पवारसाहेबांसारख्या 'समानधर्माची' तळी अगदी 'खुले आम' उचलतात. विशेष म्हणजे आपल्या या भुमिकेमुळे भाजपसारख्या मित्र पक्षाचे नेते नाराज झाले तरी त्याची ते किंचितही पर्वा



*शिवसेनेने राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना पाठिंबा द्यावा ही विनंती करण्यासाठी दिल्लीच्या आदेशावरुन तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना भेटण्यासाठी मातोश्रीवर पुष्पगुच्छ घेऊन गेले होते हे अजून लोक विसरलेले नाहीत.*

करीत नाहीत. कारण या देशाच्या पंतप्रधानपदी येण्याची क्षमता व संधी सध्या तरी फक्त आणि फक्त एकाच मराठी नेत्यास आहे.. आणि तो नेता म्हणजे शरद पवार, हे सत्य त्यांना फार पूर्वीचे उमगलेले आहे. बिचाऱ्या राजना मात्र हे समजू शकत नाही. कारण बाळासाहेब व पवारसाहेब यांच्याप्रमाणे त्यांनीही स्वतःच्या नावापुढे 'साहेब' ही उपाधी मोठ्या चलाखीने जोडलेली असली तरी त्यासाठी आवश्यक असलेल्या अभ्यास व अनुभवाची मात्र त्यांच्याकडे पूर्ण वानवा आहे.

आता आपली ही कसर ते पवारसाहेबांना नाना दूषणे देऊन आणि त्यांच्यावर दुगाण्या झाडून भरुन काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु एकीकडे 'मराठी अस्मितेच्या गोष्टी करायच्या आणि दुसरीकडे देशाच्या सर्वोच्च सत्तास्थानी येण्यास सर्वथैव पात्र असलेल्या पवारसाहेबांसारख्या सर्वसमावेशक व सर्वप्रिय सच्चा मराठी नेत्यास बदनाम करीत राहायचे ही त्यांची दुहेरी चाल आता सर्वांच्याच लक्षात आलेली आहे. कदाचित त्यांच्या दृष्टीने 'एकमेकांचे पाय ओढणे' हाच 'मराठी बाणा' असू शकतो, पण तो राष्ट्रवादीचे कार्यकर्तेच नव्हे तमाम मराठी जनतासुद्धा कदापी मान्य करणार नाहीत, हे निश्चित. महाराष्ट्राच्या राजकारणातील या नव्या 'सरड्याने' लोकसभेच्या जास्तीतजास्त जागा लढविण्याची घोषणा करुन 'मोठी राजकीय शक्ती' असल्याचा आव सध्या आणला असला तरी त्याची धाव अखेर कुंपणापर्यंतच राहाणार आहे. त्याची पूर्ण कल्पना असल्यामुळेच खुद्द पवारसाहेबांनी आपल्या एका ताज्या भाषणात ''शिव्या देणाऱ्यांकडे अजिबात लक्ष देऊ नका, कारण आपल्याला हाणामारीने नव्हे तर कामाने पक्ष मोठा करायचा आहे असा मार्मिक संदेश 'राष्ट्रवादीच्या' कार्यकर्ते व समर्थकांना दिला आहे. परंतु त्याचे मर्म जाणून विधायक कामांवर सारे लक्ष केंद्रित करीत असतांना 'इतरांना शिव्या देणे हेच ज्यांचे मुख्य राजकीय भांडवल' अशा राजसारख्या अतिसामान्य मंडळींना त्यांची योग्य जागा दाखविणे, ही आपली जबाबदारी राहाणार आहे. स्वतःला महाराष्ट्रनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ म्हणवुन घेण्यात अभिमान मानणाऱ्या आपण सर्वांनी ही जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली तर या देशात पुन्हा एकवार पुरोगामी व धर्मनिरपेक्ष विचारांचे सरकार येईलच पण त्या सरकारचे नेतृत्व आपले लाडके नेते शरद पवार यांच्याकडे यावे हे आपले फार काळचे स्वप्नही निश्चितपणे पूर्ण होईल. त्या दृष्टीने आगामी निवडणुका फार महत्वाच्या आहेत... तस्मात मतदारराजा जागा हो, जागा हो !!

■■■




# मराठा समाजाने रास्त मागण्या कराव्यात

**- शरद पवार**

कुकडी प्रकल्पांतर्गत पिंपळगाव-जोगे धरणातून डाव्या कालव्यात पाणी सोडून सिंचन करण्याचा शुभारंभ केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठामंत्री श्री. शरद पवार यांच्या शुभहस्ते ९ फेब्रुवारी, २००९ रोजी जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथे संपन्न झाला. याप्रसंगी श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण.

तुमच्या तालुक्याचे लोकप्रतिनिधी व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष श्री. वल्लभशेठ बेनके, राज्य सरकारमधील आपले प्रतिनिधी आणि महाराष्ट्र सरकारचे अर्थमंत्री दिलीपराव वळसे पाटील, जलसंपदा मंत्री रामराजे नाईक निंबाळकर, आज अगत्याने या ठिकाणी असलेले पद्मश्री लक्ष्मण माने, विधानसभेचे सभासद श्री. मोतीराम पवार, राज्याचे आमचे ज्येष्ठ सहकारी मधुकरराव पिचड , आमदार विलासराव लांडे, दिलीप मोहिते, आमचे जुने सहकारी माजी आमदार राम कांडगे, पोपटराव गावडे, वसंतराव झावरे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा वैशालीताई आबणे, उपाध्यक्ष शरद लेंडे, नगरपरिषदेच्या जुन्नरच्या अध्यक्षा रेश्मा इनामदार,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष प्रकाश म्हस्के, व्यासपीठावरील अनेक मान्यवर आणि उपस्थित सहकारी बंधूभगिनींनो,

आज मी बऱ्याच दिवसांतून आपल्या सगळ्यांच्या समोर येतोय. सकाळी निघालो आणि लक्षात आलं की आज काय आपण बरोबर दिवस घेतलेला नाही. म्हटलं आज माघ पौर्णिमा आहे. बहुतेक बकरी शिल्लक नसतील. खंडोबाचं असेल ना रे गावात. का आता बंद झालं ? हे कुठलं बंद होतंय ? खायचं सोडणार आहे का आपण ? काही तरी निमित्त लागतं आपल्याला. दुसरं काही नाही. बोकड कापायला. पण तरीही आपण मोठ्या संख्येनं आला, आनंद हा महत्त्वाचा आहे की जुन्नर तालुक्यामध्ये ज्या परिसरामध्ये नेहमी पाण्याचं दुर्भिक्ष्य, दुष्काळाचं संकट. त्या परिसरातील शेती ओलती करण्याच्यासाठी बागायती करण्याच्यासाठी जे स्वप्न आपण अंतःकरणामध्ये ठेवलं होतं, मनामध्ये ठेवलेलं होतं, आज वल्लभशेठ असतील, दिलीपराव असतील, रामराजे असतील, अजित पवार असतील, या सगळ्यांच्या प्रयत्नांनी त्याची पूर्तता होती आहे, याचा मला मनापासून फार आनंद वाटतो आहे. ज्या वेळी मी पाणी पाहिलं मघाशी कालव्यातून जाताना, त्या पाण्यात मला काय दिसलं असेल ? मला त्या पाण्यामध्ये हरिभाऊ गुंजाळ दिसले. कधी भेटले तर या प्रश्नाशिवाय त्यांनी कधी मागणी केलीच नाही. मला त्या पाण्यामध्ये रामचंद्र पाटील दिसले. अत्यंत निष्ठेनं, प्रामाणिक साथ देणारा सहकारी , पंचायत समितीचा सभापती. पाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी अतिशय जिद्द ठेवणारा. त्या पाण्यामध्ये मला दिसले. काल मुंबईमध्ये मला आठवण झाली ती आमचे मुकुंदराव पाटील यांची. कुठल्या कार्यक्रमाच्या निमित्तानं मुंबईमध्ये भेटले आणि मला कार्यक्रमाला घेऊन गेले तर तो कार्यक्रम बाजूला राहिला अन् त्या भागातील पाण्याच्या प्रश्नाचं मांडल्याशिवाय पाटलांना कधी विस्मरण झालं नाही. त्यांची मनापासूनची इच्छा होती. सुरुवातीच्या काळामध्ये श्रीकृष्ण तांबे यांची त्याच्यामध्ये इच्छा होती. या सगळ्यांचे प्रयत्न त्यासाठी होते. आज हे जे पाणी आलंय, ते त्या लोकांच्या चिकाटीमुळे. व्यासपीठावर बसणाऱ्या लोकांचा वाटा त्यात नाही, असं नाही. पण या पाण्याला विकासाच्या दिशेनं नेण्यासंबंधीची आवश्यकता आहे. त्या परिसरातील लोकांच्या डोळ्यातील अश्रू आणि दुष्काळाचं संकट आणि पाण्याची त्यांची तहान ही भागविण्यासाठी आपण प्रयत्न केला. त्याची मांडणी ज्यांनी आयुष्यभर केली आज ती मंडळी व आमचे जुने सहकारी या ठिकाणी नाहीत, पण माझी खात्री आहे की त्यांच्या





आत्म्याला मनापासून समाधान होईल, अशा प्रकारचं काम आज वल्लभशेठ तुम्ही या ठिकाणी केलं आहे.

पाणी हीच शेतीची संजीवनी आहे. आपल्या देशामध्ये चाळीस टक्के जमिनीला फक्त पाणी आहे. साठ टक्के या देशातील शेती ही निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. आज आपण भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला, असं म्हणतो. त्या देशाच्या चाळीस टक्के जमिनीमध्ये साठ टक्के शेतीचं उत्पादन होतं, अन्नधान्यं होतं आणि राहिलेल्या साठ टक्के जिराईत जमीनीमध्ये चाळीस टक्के उत्पादन होतं. लोकसंख्या वाढतीय. यंदाच्या वर्षी आपण तेवीस कोटी लाख टन गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी या देशामध्ये तयार केली. आणि आणखी पंचवीस वर्षांनी आपल्याला ४५ कोटी लाख टन अन्नधान्य लागणार आहे. जमीन तर काय वाढणार नाही. नागरीकरण वाढतंय. शहरच वाढताहेत. आळेफाटा वाढतोय, नारायणगाव वाढतंय, जुन्नर वाढतंय, मंचर वाढतंय, राजगुरुनगर वाढतंय, सगळ्या गावांचा विस्तार होतोय. हा कालवा काढायचा म्हटलं, तरी सुद्धा जमीन जातीय. ही कुकडीची पाच धरणं आपण बांधली. हजारो एकर जमीन त्याच्यामध्ये आपल्याला शेतीची द्यावी लागली. एखादा केंद्र सरकारचा प्रकल्प आला, राज्य सरकारचा प्रकल्प आला की शेकडो एकर जमीन त्याला द्यावी लागते. आत्ता मी वल्लभशेठच्या भाषणात ऐकलं की एक शिक्षणाचा प्रकल्प काढायचा विचार आहे. इथं काढावा, अशी माझी इच्छा होती. केंद्र सरकारशी वाटाघाटी केल्या, दिलीपरावनी वाटाघाटी केल्या. जमीन किती पाहिजे ? ७५० एकर. आता ७५० एकर जमीन जुन्नर तालुक्यामध्ये संपादित करायला गेलो तर लोक म्हणतील, काही नको, ते म्हणतील पुण्याबिण्याला न्या. आम्ही पोरं तिकडं पाठवू पण आमच्या जमिनी काही घेऊ नका.

आपल्या देशामध्ये सगळ्यांना विकास पाहिजे असतो. प्रगती पाहिजे असते. हे सगळं झालं पाहिजे पण माझ्या वावरात काय यातला विषय येऊ देऊ नका. बाकीच्यांचं बघा. पण काम झालं पाहिजे आणि याचा उल्लेख या ठिकाणी वल्लभशेठनी केला. मी त्या कार्यक्रमाला हजर होतो. चव्हाणसाहेब पूजेला बसले. कै. यशवंतराव चव्हाण. त्या वेळी एका भगिनींनं ताट असं फेकून दिलं. मला माहीत नाही तुमच्यातील काही मंडळी कदाचित त्याला हजर असतील जुन्या काळातील. तो काही चव्हाणसाहेबांच्याबद्दलचा राग नव्हता. धरण होऊ नये, असं वाटत नव्हतं. पण ज्याच्यावर माझी पुढची पिढी जगणार आहे, ती माझी काळी आई ही याच्यातून नष्ट होणार आहे, त्याचा संताप त्या माऊलीकडं होता, दुसरा काही राग नव्हता. त्याच्यामध्ये तिची चूक आहे, असं मी म्हणणार नाही. आज दिवसेंदिवस जमिनीचं क्षेत्र हे कमी होत आहे आणि जमिनीवरची माणसं वाढत निघाली आणि आम्ही म्हणतोय, शेतीचं उत्पादन वाढवा. पण काही लोक म्हणतात देवाजीच्या मनात आलं, त्याला काय ? आता देव देतोय होय ? देऊ द्या. आज हिंदुस्थानामध्ये ८२ टक्के शेतकरी असा असेल, की ज्याची जमीन पाच एकरांच्या आत आहे. त्यातील साठ टक्के जमीन मघाशी मी सांगितल्याप्रमाणे जिराईत आहे. आता साठ टक्के



जिराईत शेतकरी पाच एकराच्या आतील ज्याच्या जमिनीमध्ये अनेक ठिकाणी कुसळसुद्धा उगवत नाही. त्या पाच एकर , चार एकर, तीन एकरवाल्यांनी पाच जणांचा प्रपंच चालवायचा, मुलांना शिक्षण द्यायचं, म्हातारपणामध्ये आपली सोय करायची हे काय शक्य आहे ? हे शक्य नाही. म्हणून मघाशी मी एके ठिकाणी बोलत असताना सांगितलं की मी जगातील अनेक देशांमध्ये गेलो. जिथं शेतीवरची माणसं कमी केली आणि अन्य क्षेत्रात गेली, तिथं शेती संपन्न झाली आहे. आज जर पाच एकराचं क्षेत्र हिंदुस्थानामध्ये ८२ टक्के लोकांचं असेल, तर आणखी वीस वर्षांनी त्या पाच एकरामध्ये वाटण्या होतील पोरांच्यामध्ये आणि दोन एकराच्या आत येतील. त्यांच्या पुढच्या पिढीमध्ये अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक होतील. आणि त्यांच्या पुढचा कोणी तरी एक भूमिहीन आणि एक अत्यल्पभूधारक. आता हा संसार कसा करायचा त्यांनी ? म्हणून आपल्याला काही तरी केलं पाहिजे. एक तर शेती उत्तम केली पाहिजे. त्याच्यातून अधिक उत्पादन काढलं पाहिजे आणि त्या शेतकऱ्याच्या , शेतमजुराच्या, दलिताच्या , भटक्याच्या कुटूंबातील एकजण तरी ज्याला जमीनजुमला नाही, त्याला शिकवलं पाहिजे, आणि दुसऱ्या क्षेत्रामध्ये त्याला पाठवलं पाहिजे. हे पाठवायला जे यशस्वी झाले, त्या देशांची गरिबी कमी झालेली आहे. तेथील बेकारी कमी झालेली आहे. आपल्याला त्या रस्त्यानं जावं लागेल. मी हे बोलायला लागलो, तर आमच्या मुंबईच्या सगळ्या वर्तमानपत्रांनी लिहिलं, याला कसला शेतीमंत्री म्हणताय, हा शेतीच्या बाहेर चाललाय. मी म्हणतो, सगळ्यांनी शेतीत जायचं नाही, असं मी म्हणतो. एकानं शेती करावी, बाकीच्यांनी उद्योग करा.

जुन्नर तालुक्यानं शिकवलंय आम्हाला. पूर्वीच्या काळामध्ये क्रॉम्फर्ड मार्केटमध्ये गेलं की कडक पांढरी टोपी, जॅकेट आणि त्याच्या वरच्या खिशात हात असे शेठ त्या ठिकाणी बसलेले . आमच्या मिरच्या घेऊन जा, नाही तर कांदे घेऊन जा नाही तर काहीही घेऊन जा. शेठनं कधी तरी एक गरम गरम ग्लास चहा दिला, संध्याकाळी जेवण देणार, एखादा सिनेमा दाखवणार. मग हा गावाकडं येऊन सांगतो, शेठचा काय वट आहे ते. त्यानं आमचा वट काय ठेवला म्हणे. खूश. मग नंतर पट्टी नाही मिळाली तरी चालेल एखाद्या वेळेला. म्हणजे सगळ्यांबद्दल मी म्हणत नाही. असो. पण हे सगळं का केलं, जुन्नरच्या आंबेगावच्या सहकाऱ्यांनी. त्याचं महत्त्वाचं कारण



त्यांना हे पटलेलं होतं की निव्वळ शेती एके शेती करून चालणार नाही. दुसऱ्या क्षेत्रामध्ये गेलं पाहिजे आणि त्यांनी तो आदर्श आपल्या सगळ्यांच्यासमोर ठेवलेला आहे. आणि ते करायचं असेल,तर शैक्षणिक पाया मजबूत असला पाहिजे आणि त्यासाठी जर या ठिकाणी वल्लभशेठ काही करायचं म्हणत असतील, तर आपण सगळेजण बसू. जबाबदाऱ्या वाटून घेऊ. तुमची जबाबदारी जमीन द्यायची. उभं करायची जबाबदारी माझी.(जोरदार टाळ्या) तुम्ही जमिनीला पैसा मागू नका. उभं करायला तुम्हाला एक दमडीसुद्धा मागणार नाही. एखादं मध्यवर्ती ठिकाण काढा आणि जुन्नर तालुक्याची मग ती आदिवासींची मुलं असतील, गोरगरिबाची असतील, भटक्याची असतील, नाही तर दलितांची असतील, नाही तर शेतकरी-शेतमजुराची असतील, त्यांच्यातून सबंध देशाचा नावलौकिक वाढविण्याच्यासंबंधीचं कर्तृत्ववान , आपल्या बुद्धीचं तेज दाखवणारी मुलंसुद्धा या ठिकाणी पैदा होतात आणि म्हणून ज्या भूमीनं हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्याच्यासंबंधीचा इतिहास रचणाऱ्या छत्रपतींना जन्म दिला, ती भूमी अशी काही साधीसुधी नाही. ती भूमी कर्तृत्वाचा महामेरू तयार करणारी, नवी पिढी तयार केल्याशिवाय राहणार नाही. त्याला आपल्या सगळ्यांचा हातभार लागला पाहिजे. मला आनंद आहे की आपण त्या दृष्टीनं



आत्ताच पुढं चाललो आहोत. पाणीही आता वाढायला लागलेलं आहे. थोडं थोडकं नव्हे, मी आत्ता आकडेवारी घेतली सरकारी अधिकाऱ्यांकडून. ६२ हजार हेक्टरला पाणी या तालुक्यात मिळणार आहे. सगळ्या प्रकारच्या प्रयत्नांनी. मग लिफ्ट असेल, सहकार असेल, विहीर बागायत असेल, लोकांचे प्रयत्न असतील. बारामतीमध्ये २७ हजार हेक्टर आहे. आणि तुमच्याकडं ६२ हजार हेक्टर. उत्तम शेती करता तुम्ही. कष्टानं करता. एके काळी ओतूर आणि त्या सगळ्या परिसरातील केळी ही सगळ्या मुंबईपर्यंत गेली होती. आता केळीच्या बागा होतायत. द्राक्षाच्या बागा दिसतायत. भाजीपाला आपण करीतच असतो. फुलांच्या क्षेत्रामध्येही आपण गेलो. थोडंफार दुधाच्या क्षेत्रामध्ये कमी दिसतोय. मला माहीत नाही या सगळ्या शेतीच्या संबंधित क्षेत्रामध्ये आपण पुढं जाण्याचा सतत प्रयत्न करतोय आणि दर्जेदार शेती करण्याच्यासंबंधीचा लौकिक आज या सबंध पुणे जिल्ह्यामध्ये कोणी निर्माण केला असेल, तर तुम्ही मंडळींनी केलेला आहे. (टाळ्या)

संस्था नीट चालल्या पाहिजेत. आणि मला आनंद आहे की, तुमचा कारखानासुद्धा योग्य रीतीने तुम्ही चालवताय. सोपानशेठ दिसत नाहीत इथं. भेटत असतात. पण ते कारखाना चांगला चालवतायत. राजकारण त्या ठिकाणी आणत नाहीत. जो कोणी संस्था उत्तम चालवतोय, शेतकऱ्याच्या संसाराला हातभार लावायचा प्रयत्न करतो, त्याचा मी पक्ष बघत नाही. तो आमचा मित्र आहे. तो आमचा साथी आहे. तो शेतकऱ्यांचा मित्र आहे. माझी खात्री आहे की, यंदाच्या वर्षी मघाशी दिलीपरावांनी म्हटले त्याप्रमाणे तुमच्या या उसाला पंधराशे-सोळाशे रुपयांच्यावर भाव मिळाल्याशिवाय राहणार नाही. (टाळ्या) तुम्ही टाळ्या वाजवतायं पण तिकडं लोकसभेत मला शिव्या खाव्या लागतात. कारण जे इथं भाव मिळाला पाहिजे



*समारंभस्थळी लावण्यात आलेल्या माहितीच्या तक्त्यांची पाहणी करताना शरद पवार, दिलीप वळसे-पाटील, रामराजे नाईक-निंबाळकर, पोपटराव गावडे, प्रकाश म्हस्के, जिल्हाधिकारी चंद्रकांत दळवी आणि इतर मान्यवर.*



म्हणतात, तर तिथं म्हणतात, या साहेबानं आपल्या उसवाल्यांसाठी साखरेचा भाव वाढविला. साखर नाही वाढली तर उसाचा भाव कसा वाढेल ? आपल्याकडे मंडळी दुटप्पी असतात. इथं एक बोलायचं. तिथं एक बोलायचं. तिथं गहू स्वस्त मिळालाच पाहिजे, इथं गव्हाला भाव मिळालाच पाहिजे. तिथं साखर स्वस्त मिळाली पाहिजे, इथं उसाला भाव वाढलाच पाहिजे. तिथं म्हणायचं आमच्याकडे दुर्लक्ष करतात, इथं म्हणतात तुमचा शेती मंत्री असूनही होत नाही. बरं, ठीक आहे. काही लोकांचा तो उद्योग असतो. त्यामुळं त्याची फारशी चिंता करण्याचं कारण नाही. दिलीपरावांनी सांगितलं की त्यांच्याकडे सत्ता होती, तेव्हा संपूर्ण माफीची गोष्ट बोलले होते. खरं आहे. माफीचा निर्णय घ्यावा, अशी माझी इच्छा फार वर्षांची होती. मी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या पुढं बोलत होतो. म्हटलं की एकदाचं कधी तरी शेतकऱ्याच्या डोक्यावरचं ओझं कमी करा. शेवटी हिशेब केला आणि लक्षात आलं की, अडीच लाख कोटी सगळ्यांचं माफ करायला लागतील. मग कसं करायचं म्हटलं. मग टप्प्याटप्प्यानं करू. पहिलं थकबाकीदारांचं करू. केलं थकबाकीदारांचं. सत्तर हजार कोटी लागले. ३५ टक्के शेतकऱ्यांना, तीस टक्के शेतकऱ्यांना काही ठिकाणी- तुमच्या सारख्या ठिकाणी तुम्ही नेहमी भरता, त्यामुळं तुमच्याकडं आणखी कमी शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला. सगळ्या हिंदुस्तानात ७१हजार कोटी माफ केले. पण आम्हाला काही दिलं नाही, असे अनेक लोक म्हणाले. मला आठवतंय, की तो निर्णय जाहीर झाला आणि एके दिवशी रात्री म्हणजे दोन-तीन दिवसांतच जुन्नर तालुक्यातील कोणी तरी फोन केला. म्हणाला, आमच्या लिफ्टांचं काय ? म्हटलं ठीक आहे. आजकाल काय झालंय, मोबाईलमुळं सोपं झालंय. मोबाईल घेतोय, कुठूनही करतोय. माझी तर पार दैना होत असते. मी खूप वेळा परदेशात असतो. गेल्या आठवड्यात ऑस्ट्रेलियात होतो. इथं ज्या वेळी दिवस असतो, तिथं मध्य रात्र असते. इथं गडी उठला की लावला त्यानं फोन. बरं तिथं रात्री दोन वाजता फोन वाजला तर काय गडबड झाली की काय म्हणून दचकून उठतो आणि फोन घेतो. तर तो विचारतो, काय कसं काय, बरं हाय का ? म्हटलं, लेका एवढ्या रात्री फोन का केलास ? काय न्हाय म्हणे सहज चौकशी करायला केला होता. म्हणाला, सगळ्यांचं फिटलं, आमचं नाही फिटलं. म्हटलं कशाचं फिटायचं राहिलंय तुझं. म्हटला, लिफ्टाचं फिटायचं राहिलंय. म्हटलं, सकाळी बोलू या. तर म्हटला सकाळीच बोलतोय की. मी म्हटलं, असं होय. अरे मी ऑस्ट्रेलियात आहे. इथं रात्र आहे. तेव्हा म्हटला मग सकाळी बोलू.



पण एक आहे की, हा निकाल घेताना एकदम कुठलाही निर्णय सरकारला घेता येत नाही. कारण दोन लाख तीन लाख कोटी माफ करणं एका वर्षात शक्य होत नाही. तुमच्या पुढं अन्न तयार करून ठेवलं आणि ते सगळं अन्न हजार पाचशे लोकांना पुरवायचं एका झटक्यात , एका ताटामध्ये म्हटलं तर कुणी संपवू शकतो का ? तसं ही एवढी मोठी जबाबदारी घ्यायची असेल, तर टप्पे करावेच लागतील. मग पहिलं कोणाला द्यायचं, थकबाकीदाराला. त्याच्याबाबतीतही लोकांच्या तक्रारी आल्या. काही खऱ्या होत्या,काही खोट्या होत्या. कुणाकडं पाऊसच पडला नाही, पाणी नाही मिळालं म्हणून पीक गेलं. त्यांचं माफ केलं, चांगलं झालं. काही लोकांचा भावच पडला त्यामुळं



*कुकडी प्रकल्पाचे अधिक्षक अभियंता राजेंद्र पवार यांनी समारंभस्थळी शरद पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.*

काही मिळालं नाही. काही मंडळी भारी. सगळीकडचं घ्यायचं आणि म्हणायचं नाही. त्यांचा फायदा झाला. लोकांना तेवढंच खटकलं. हा भरत नाही, दुनियेचं खातोय, तो सुटला आणि मी बायकोचं मंगळसूत्र गहाण टाकून भरतोय आम्हाला मात्र काही मिळालं नाही. महाराष्ट्र सरकारनं विचार केला. वीस हजार पर्यंत माफ करु. राज्य सरकारनं निकाल घेतला. आता एका वर्षी सगळं फिटलं जात नाही. आमच्याही डोक्यात आहे. आता यानंतर दोन ठिकाणी पहिल लक्ष द्यायचं. अंदाजपत्रक खर्चाचं एकदम करता येत नाही. आपण खेड्यापाड्यातसुद्धा घर बांधायला काढतो, विहीर बांधायला काढतो, ट्रॅक्टर आपल्याला हवा असतो. पण एका वेळी सगळं करीत नाही. एकेक काम संपवतो. आत्ता हे घेऊ. ते नंतर घेऊ असं करतो. तसा आम्ही विचार केलेला आहे. आमचा विचार हा आहे की आता याच्यानंतर काय करायचं असेल, तर पहिल्यांदा गावातील तुमच्यापेक्षा कमी जमीन असलेल्या किंवा जमीनजुमला नसलेल्या आणि गरीब असलेल्या त्यांनी कुठून पैसा घेतला असेल, आण्णाभाऊ साठे महामंडळ म्हणा, महात्मा फुले महामंडळ म्हणा किंवा आणखी काय असेल, त्याच्या डोक्यावरचं ओझं कमी करायचं.

आज कालवा झाला. त्याच्या शिवारात पाणी आलं, हा उलट खूप वर्ष थांबला. त्याचं चांगलं झालं. पण काही ठिकाणी लोकांनी स्वतःच्या डोक्यावर कर्ज कारून लिफ्ट काढून पाणी नेलं ते दुर्दैवानं थकित झाले. आमच्या डोक्यात आहे की आता यांच्यानंतर त्यांचा नंबर लावायचा. अशा दोन गोष्टींना आपण पहिल्यांदा नंबर लावू. यांना मोकळं करू मग पुढच्यांकडं बघू. पण आमचे सगळे पार्लमेंटमधील म्हणा किंवा विरोधी पक्षातील नेते म्हणतात, यांना तुम्ही जाणता राजा म्हणता, राज्यातील शेतकऱ्यांचे कैवारी म्हणता पण सगळ्यांना कुठं मिळालं ? लेका, सगळ्यांना कसं मिळेल ? हिंदुस्थानची लोकसंख्या शंभर कोटींवर. त्यातील साठ टक्के शेतकरी म्हणजे झाले साठ कोटी. एका वर्षात साठ कोटी लोकांचं सगळं भागवायचं, परमेश्वर आला तरी शक्य आहे का ? टप्प्याटप्प्यानं करण्याचा प्रयत्न करतोय. त्याच्यापाठीमागचा हेतू हा आहे



की शंभर कोटी लोकांचा जो पोशिंदा आहे तो संकटातून बाहेर आला तर हा देश पुढं गेल्याशिवाय राहणार नाही. त्याला शेतीला पाणी देण्यासाठी अधिक पैसा पुरविणं , त्याच्या शेतमालाला रास्त किंमत देणं आणि त्यानं तयार केलेल्या मालाला देशातील , जगातील बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न करणं आणि त्याच्या मुलाबाळांना शिक्षणाच्या माध्यमातून अन्य क्षेत्रामध्ये पदार्पण करण्याच्यासंबंधीचा रस्ता खुला करणं या सगळ्या भावनेनं जर आपण पुढं गेलो तर मला खात्री आहे की हिंदुस्थानच्या ग्रामीण भागाचा चेहरा बदलल्याशिवाय राहणार नाही. आणि ज्या दिवशी हिंदुस्थानचा चेहरा बदलेल त्या दिवशी महात्मा गांधींना अभिप्रेत असलेला स्वातंत्र्याचा अर्थ कृतीमध्ये येईल. आणि त्या रस्त्यानं जाण्यासंबंधीचा विचार आपल्याला केला पाहिजे.

ते करायचं असेल, तर योग्य विचारांची दृष्टी असलेली , कार्यक्रम असलेली , नीती असलेली मंडळी त्या ठिकाणी बसण्याची गरज आहे. आणि ते करायचं असेल, तर त्याच्यासाठी योग्य प्रकारची माणसं आपण निवडली पाहिजेत. हे या निमित्तानं मला आपल्याला सांगायचं आहे.

अनेक प्रश्न येतात. आत्ता मला कुणी तरी निवेदन दिलं. मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे म्हणून. मला कुणी तरी विचारलं, तुमचं मत काय आहे म्हणून. मी जाहीरपणानं सांगितलं, वर्तमानपत्रांना सांगितलं की जसा ओबीसी समाज असेल, दलित असेल तसाच मराठा समाजातसुद्धा गरीब वर्ग आहे. शेतमजुरी करणारा आहे, एकर दीड एकर जमीन आहे, जिराईत जमीन आहे, असा आहे. कुठे झोपडपट्टीत राहणारा आहे. शेतीवर प्रपंच चालत नाही, त्यामुळं शिक्षण घेता येत नाही असा आहे. या मुलांना शिक्षणाच्यासाठी सवलत मिळाली, त्याला प्रवेश मिळाला , त्याला शिक्षण मोफत मिळालं, सवलतीच्या दरात मिळालं, थोड्या सरकारी नोकरीमध्ये त्याच्यासाठी काही जागा काढून ठेवल्या, थोड्या सरकारच्या आर्थिक सवलती असतात त्या त्याला दिल्या. ही गरज आहे. पण हे करीत असताना दुसऱ्यांना मिळतं, त्यांचं काढून घेऊन

त्याला द्यायची गरज नाही. आपल्या देशामध्ये पन्नास टक्के जागा आपण राखून ठेवल्यात. आदिवासींच्यासाठी, दलितांच्यासाठी , इतर मागासवर्गीयांसाठी, भटक्यांच्यासाठी. आणि पन्नास टक्के जागा खुल्या आहेत. आणि गोरगरिबांच्यासाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवलेल्या आहेत. त्या कायम ठेवा. त्यांच्या ताटातील आम्हाला काही नको. राहिलेल्या पन्नास टक्के आहेत, त्याच्यातील खुल्या जागा आहेत, त्यातील काही त्यांच्यासाठी आहेत. अन्य काही जण इतर समाजाचे असतील, त्यांना त्या मिळाल्या पाहिजेत. मुस्लिम समाजाचे असतील, त्यांना मिळाल्या पाहिजेत. मराठा समाजातील गरिब मुलामुलींना द्या. म्हणून मी अनेक जणांशी बोललो. सगळ्यांना हा मार्ग पसंत आहे. हे आरक्षण इतरांचं कायम ठेवून त्यावर आपण जर ठेवलं तर ते लोकांना पसंत आहे. आणि ते आरक्षण देण्याच्यासाठी राज्यसरकारला आम्ही सांगणार आहोत आणि ते देण्याची व्यवस्था करणार आहोत. पण काही लोकांनी मागणी केली आहे की, आम्हाला राजकीय आरक्षण पाहिजे. राजकीय आरक्षण म्हणजे काय, म्हणजे आमदार व्हायला खासदार व्हायला , जिल्हापरिषदेचा सभासद व्हायला, म्युनिसिपाल्टीचा सभासद व्हायला आम्हाला आरक्षण पाहिजे. याची गरज आहे का ? मी मुलांना विचारलं, मराठवाड्यामध्ये बाबांनो, तुम्हाला काय पाहिजे ? तुम्हाला झेडपीला सभासद व्हायचंय का सरकारी नोकरी पाहिजे ? ती म्हणाली, झेडपीचं सभासद कुणाला व्हायचं असेल, त्याला होऊ दे. आम्हाला शिकायची संधी द्या, आम्हाला सरकारी नोकरी द्या, आम्हाला कुठलंही काम द्या. आम्हाला प्रपंच चालवायची व्यवस्था करा. पण काही लोकांना जिल्हा परिषदेची निवडणूक जास्त महत्त्वाची वाटते. खेड्यापाड्यामध्ये मी बघतो अनेक ठिकाणी जरा बरं पोरगं शिकलं की गाव त्याला पुढं नेण्याच्यासंबंधीचं उद्योगधंद्यासंबंधीचा सल्ला देत नाही. मग करू यंदाच्या वर्षी त्याला झेडपीला उभं, नाही तर पंचायत समितीचा सभासद. फारच तयार असेल, तर सभापती. बराच तयार असेल, तर म्हणतील बँकेचा प्रतिनिधी. होईल तयार. कोणी म्हणेल याला बँकेचा डायरेक्टर करा. म्हणजे सगळं लक्ष त्याच्यावरच. बँकेचा डायरेक्टर झाला की आमदारकीचं आरक्षण झालं.

समजा आरक्षण झालं, तर जागा किती तुमच्या तालुक्यात. तर एक. मग एक जागा महत्त्वाची आहे का हजारो मुलांना शिक्षण देऊन त्यांना नोकरी देण्यासंबंधीचं आरक्षण महत्त्वाचं आहे. माझी खात्री आहे की या देशामध्ये, या राज्यामध्ये सर्वसामान्य समाजाच्या मुलामुलींना आज गरज आहे शिक्षणाची, नोकरीची, आर्थिक सवलतींची. आणि म्हणून त्या पद्धतीचा निकाल घेण्याची सरकारची तयारी आहे. उगीचच राजकीय आरक्षण मागू नये. आणि राजकीय आरक्षणाची गरज कोणाला असते, ज्यांना प्रतिनिधित्व मिळत नाही अशा समाजाला राजकीय आरक्षण द्यायचं. मी आता यादी करीत होतो. म्हटलं, पुणे जिल्ह्यामध्ये किती आमदार आहेत ? राजकीय आरक्षण कोणाला पाहिजे तर मागासलेल्यांना. तर पुणे जिल्ह्यात आमदार आहेत अठरा. अठरामध्ये इतर समाजाचे कोण आहेत ? बापट आहेत, मागासवर्गीयांमधील बागवे आहेत, मारवाडी समाजाचे छाजेड आहेत. माळी समाजाच्या आमच्या कमलताई आहेत आणि शिवरकर आहेत. १,२,३,४,५. आता मराठा समाजाचे किती ? निम्हण, विलास लांडे, बापूसाहेब भेगडे, अशोक टेकावडे-राष्ट्रवादी, हर्षवर्धन पाटील-स्वतंत्र किंवा अपक्ष, अजित पवार-राष्ट्रवादी, रंजना कुल-राष्ट्रवादी, बाबूराव पाचर्णे-भाजप, दिलीप मोहिते-राष्ट्रवादी, दिलीप वळसे पाटील-राष्ट्रवादी, वल्लभ बेनके - राष्ट्रवादी.

म्हणजे तेराजण अठरापैकी एकाच समाजाचे. तरी आरक्षण पाहिजे ? (जोरदार हशा) . बरं आहे का हे मागणं ? (पुन्हा हशा). हे असं आहे. मग बाकीच्यांनी काय करायचं. तुम्हाला मतंच टाकायची. उगीच आपलं गोड लागलं म्हणून मुळासकट आपलं हाणायचं, हे काय बरं दिसत नाही. (हशा आणि टाळ्या. ) काय मागावं, काय मागू नये, यासंबंधीचं तारतम्य ठेवलं पाहिजे. शिक्षणाला महत्त्व आहे. नोकरी मागा, आर्थिक क्षेत्रात सगळ्या मुलांना, गरीब मुलांना संधी द्या. इतरांच्या बरोबर त्यांना घ्या. पण उगीचच काही तरी बोलू नका. राजकीय आरक्षणाची कल्पना मला स्वतःला योग्य वाटत नाही. आणि जे योग्य नसेल त्याला योग्य नाही म्हणण्यासंबंधीचं धाडस हे दाखवलं पाहिजे. आपल्या समाजाला योग्य पद्धतीचं मार्गदर्शन केलं पाहिजे. आणि म्हणून हा महत्त्वाचा विषय आहे. कारण मी वर्तमानपत्रामध्ये आज वाचलं, मुख्यमंत्री शिवनेरीवर आल्याच्यानंतर हा निर्णय झाला नाही, तर रक्ताचे पाट वाहतील असे कोणीतरी म्हणाले. अरे, छत्रपतींनी रक्ताचे सडे केले ते समाजाच्या संरक्षणासाठी. त्या छत्रपतींच्या सेनादलामध्ये माळी, कोळी, साळी, मुस्लिम सगळ्या जातिधर्माचे लोक होते. त्यांच्या तोफखान्याचा प्रमुख इब्राहिम मुस्लिम होता. त्यांचे अनेक किल्लेदार हे माळी समाजाचे होते, कोळी समाजाचे , आदिवासी समाजाचे होते. त्यांच्या जिवाला जीव देणारे, त्यांच्यासाठी प्राणांची आहुती

देण्याच्यासंबंधीचा प्रयत्न केलेले माळी समाजाचे होते. किती लोक आहेत हे? आणि हे राज्य जे उभं केलं शिवछत्रपतींनी बहुजन समाजासाठी. याचा अर्थ समाजाच्या तळागाळातील सगळ्या लोकांना घेऊन. त्या लोकांसाठी. महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराजांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो विचार सांगितला, तो समाजाच्या दबलेल्या लोकांना, उपेक्षित लोकांना , सर्व जातिधर्माच्या लोकांना गरिबांना बरोबर घेऊन त्याला सन्मानानं जगण्याचा अधिकार देण्यासाठी. ही एक समाजातील शक्ती आपण उभी केली पाहिजे. या लोकांना गुलामगिरीतून मुक्त केलं पाहिजे, हे त्या ठिकाणी शाहू महाराजांनीसुद्धा सांगितलं. आणि म्हणून आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिमान ठेवायचा असेल, महात्मा फुले, आंबेडकर, शाहू महाराज यांचा अभिमान ठेवायचा असेल, तर तळागाळातील सगळ्या लोकांना बरोबर घेऊन जाण्याची मानसिकता आपण ठेवली पाहिजे.

शाहू महाराजांनी त्यांच्या राज्यामध्ये आरक्षण ठेवलं होतं. तेव्हा सरदार वगैरे सगळी बडी मंडळी नाराज झाली. ते म्हणाले, सगळ्यांना आरक्षण, आम्हाला का नाही ? शाहू महाराजांनी काय केलं ते तुम्ही ऐका. त्यांनी सगळ्या सरदारांना सांगितलं, उद्या सकाळी या. आणि त्यांनी हुकूम केला त्यांच्या अधिकाऱ्यांना. की महाराजांच्या तबेल्यात जेवढी घोडी असतील, तेवढ्या सगळ्यांना आणायचं. आणि कोल्हापुरातील टांगेवाल्यांकडं जितकी घोडी असतील ती आणायची. एका बाजूला टांगेवाल्यांची घोडी आणि एका बाजूला तबेल्यातील घोडी. समोर चारा ठेवला. आणि घोड्यांना सोडलं. त्या वेळी जी तबेल्यातील घोडी होती. त्यांनी पुढं जाऊन तो चारा फस्त केला. टांगेवाल्यांची घोडी गरीब होती. ती मागं राहिली. तबेल्यातील घोडी चारा खाऊ लागली. तेव्हा टांगेवाल्यांची घोडी मागे गेली ती गरिबाची घोडी होती. त्यांच्या तोंडावर लाथा बसल्या. म्हणजे मोठ्यांच्या घोड्यांना चारा आणि गरिबांच्या घोड्यांच्या तोंडावर लाथा, अशी परिस्थिती.

समाजामध्ये हे असं असतं. आपण सगळ्यांना घेऊन जायचं असतं. ते जर आपण केलं नाही तर हा समाज एकसंध राहणार नाही. ज्या दिवशी समाजाची एकी उध्वस्त होईल, त्या वेळेला आपल्या सगळ्यांना मग तो कुठल्याही जाती जमातीचा असेल, त्यांच्या पुढच्या पिढीचं नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून रास्त प्रश्नांची मागणी करा. ती सोडवून घेण्याच्यासाठी प्रामाणिकपणाने प्रयत्न करा. त्यासाठी सरकार काही करीत असेल, तर जरूर करण्याच्या संबंधीच्या सरकारच्या भूमिकेला सहकार्य करा. पण ज्यांनी हिंदवी स्वराज्याची सगळ्यांना बरोबर घेऊन उभारणी केली, त्यांच्या जन्मदिनी राज्याचा प्रमुख येत असेल तर त्या ठिकाणी आम्ही येऊ देणार नाही आणि रक्ताचे पाट करू ही गोष्ट न शोभणारी आहे.

मला आठवतंय की एकदा असंच चव्हाणसाहेब १९६० साली का १९५७ साली कधी तरी ते येणार होते. आणि प्रतापगडावर पंडित नेहरू येणार होते, छत्रपतींच्या पुतळ्याला अभिवादन करायला. ५७ साली. त्या वेळी काहींनी असाच प्रकार केला होता. आम्ही शाळा-कॉलेजात शिकत होतो त्या वेळी. आम्ही म्हणायचो, छत्रपतींना नमन करण्यासाठी हिंदुस्थानचे प्रधानमंत्री यायचे असतील, तर आम्हाला वाईट नाही वाटायचं. आपले प्रश्न आपण सोडवून घेऊ. पण छत्रपतींचा अनादर होईल, अशा प्रकारची कुठलीही गोष्ट कोणी करत असेल, तर तो छत्रपतींचा उपासक आहे, त्यांच्या विचारांचा नाही. हे हात जोडून त्याला सांगावं लागेल. आम्हाला संघर्ष करायचा नाही. रक्ताचे पाट करायचे नाहीत. छत्रपती एका जातीचे नव्हते तर अवघ्या समाजातील गोरगरिबांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला की हे रयतेचे राज्य आहे.ते रयतेचे राजे होते. त्यांनी राज्य उभं केलं हिंदवी स्वराज्य उभं केलं. भोसल्यांचं राज्य उभं केलं नाही. छत्रपतींच्या राज्याला भोसल्यांची राजवट कोणी म्हणत नाही.

जो इतिहास मानतो, ते हिंदवी स्वराज्य म्हणतात. या हिंदुस्थानमध्ये राहणाऱ्या शेवटच्या माणसालासुद्धा या राज्यामध्ये अधिकार बहाल करण्याचं काम शिवछत्रपतींनी सगळ्यांकरिता केलं. त्यांना असं मर्यादित ठेवू नका, एवढीच माझी हात जोडून सगळ्या लोकांना विनंती आहे. समाजाची व्यापक भूमिका आपण कायम ठेवू आणि जुन्नर तालुका जिथं शिवछत्रपतींचा जन्म झाला, तिथं आपण तीच व्यापक भूमिका घेतल्याशिवाय राहणार नाही. अरे, आज जुन्नरमध्ये एक मुस्लिम तरुणी आमची नगराध्यक्ष आहे, ही गोष्ट काय साधी आहे? केवढं मोठं मन जुन्नर तालुक्यानं दाखवलेलं आहे. यापेक्षा आणखी काय या ठिकाणी करायचं. आणि म्हणून तोच आदर्श ठेवून आपण येथून पुढच्या काळामध्येसुद्धा जाण्याचा निर्धार करू, हा विश्वास या ठिकाणी बाळगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■■

# आता आपल्यापुढे आव्हान जागतिक नेतृत्व मिळविण्याचे...!



**- डॉ. रघुनाथ माशेलकर**

**आंतरराष्ट्रीय किर्तीचे शास्त्रज्ञ**



**आ**जघडीस आपल्याला आवश्यकता आहे ती आपल्या देशाचा विचार पूर्णपणे वेगळ्या पद्धतीने करणाऱ्या एका नव्या दृष्टिकोनाची! हा दृष्टिकोन केवळ भूतकाळावर, इतिहासावर आधारित असून चालणार नाही तर त्यास सद्य:स्थितीतील वास्तवाची बैठकही हवी आणि तो या महान देशातील जनसामान्यांच्या आशा-आकांक्षास सुसंगत असा साहसी, महत्त्वाकांक्षी आणि आशादायीही हवा. हा नवा दृष्टिकोन आकारास आणण्यात भारतीय विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्र फार मोलाची भूमिका बजावू शकते, असा मला ठाम विश्वास वाटतो.

**विज्ञान व अध्यात्माची सांगड घालणे आणि नितीशास्त्राची जोड असलेले विज्ञान हा आपल्या विकासप्रक्रियेचा मुख्य कणा बनविणे, हेच आजघडीस आपल्या देशापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. अर्थात ते पेलण्यास आपण निश्चितपणे समर्थ आहोत हे गेल्या काही काळातील विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीने निर्विवादपणे सिद्ध करून दिले आहे.**

हा विश्वास मला का वाटतो, असा प्रश्न कदाचित कोणाला पडू शकतो. त्याच्या उत्तरात मी एवढेच म्हणेन की, भारतीय विज्ञान-तंत्रज्ञानाच्या भरभक्कम पायानेच तो माझ्यात निर्माण केला आहे. या पायाची उभारणी केली ती आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी! पंडितजींसाठी विज्ञान हे केवळ आर्थिक विकासाचे नव्हे तर या देशातील स्थितीप्रिय समाजात गुणात्मक बदल घडवून आणण्याचे, नवचैतन्य निर्माण करण्याचे साधन होते. १९५८ साली त्यांनी आपल्या विज्ञानविषयक धोरणाचा जो मसुदा तयार केला त्यात त्यांच्या या भूमिकेचे प्रतिबिंब फार सुरेख उमटले आहे. त्या मसुद्यात त्यांनी म्हटले होते की, 'मानवजातीच्या सध्याची सर्वात मोठी चळवळ मानावी अशा विज्ञानयात्रेत पूर्णपणाने सहभागी होणे ही मूलभूत विचारप्रणाली व बुद्धीमत्तेची फार मोठी परंपरा आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेल्या भारतासारख्या महान देशाची अंगभूत जबाबदारीच आहे.'

पंडितजींच्या या दृष्टिकोनाने भारतीय वैज्ञानिकांमध्ये एक नवी स्फूर्ती स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशाने निर्माण केली. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशाने विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात खरोखरच अभिमान वाटावा अशी कामगिरी बजावली आहे. 'हरित क्रांती'चेच उदाहरण घ्या ना! या क्रांतीमुळे देशातील करोडो नागरिकांच्या भुकेचा प्रश्न तर मिटला आहेच परंतु अन्नधान्याच्या निर्यातीतही आपण मोठी आघाडी घेतली आहे. जी गोष्ट 'हरित क्रांती'ची तीच 'दुग्ध क्रांती'चीही. आज आपला देश जगातील सर्वात मोठा दूधउत्पादक देश बनला आहे तो या क्रांतीच्या जोरावरच!

संरक्षण क्षेत्रातील पायाभूत आणि सर्वंकष म्हणावे असे संशोधन व विकास यंत्रणेचे जाळे उभारण्यात यश मिळाल्यामुळे आज आपल्या देशात विविध प्रकारची क्षेपणास्त्रे व रॉकेटसह सर्व प्रकारची अत्याधुनिक शस्त्रास्त्रे तयार होत आहेत. याखेरीज अणुविज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातही आपण स्वबळावर खूप मोठी मजल मारली असून मोठमोठे 'न्यू क्लिअर रिॲक्टर्स' उभारण्याचे काम आता आपण कोणाच्याही मदतीशिवाय सहजी करू शकतो.

आज जगभरातील फार मोजक्या देशांनी अवकाश विज्ञान व तंत्रज्ञानावर हुकूमत प्राप्त केली असून त्यात भारताचा समावेश होतो. विविध प्रकारच्या उपग्रहांची रचना व उभारणी आणि उपग्रह प्रक्षेपण तंत्रज्ञानही आपण आत्मसात केले असून, विशेष म्हणज अत्यंत अल्प खर्चात आपण हे सर्व कार्यक्रम तडीस नेलेले आहेत. अवकाश तंत्रज्ञान कार्यक्रमांसाठी गेल्या वर्षी आपल्या अर्थसंकल्पात फक्त ६०० कोटी डॉलरची तरतूद होती. अमेरिकेतील जनरल मोटर्स ही कंपनी संशोधन व विकास कार्यक्रमांवर दरवर्षी सातशे कोटी डॉलर खर्च करते हे लक्षात घेतले म्हणजे आपले काम किती काटकसरीने पण कार्यक्षमतेने चालू आहे, याची कल्पना कोणालाही सहजी येऊ शकेल. आपल्या अवकाश संशोधन कार्यक्रमाने नेमके काय साध्य केले आहे हे पाहू गेले तर असे दिसते की गेल्या काही काळात आपण उपग्रह रचनांच्या बाबतीत 'एएसएलव्ही' वरून 'जीएसएलव्ही'पर्यंत मजल मारली आहे. या सर्व उपग्रहांची बांधणी, रचना, चाचण्या आणि प्रेक्षपण आपण कोणाच्याही



मदतीविना करतो आणि तेही आधी म्हटल्याप्रमाणे अगदी कमीतकमी खर्चात. आत्तापर्यंत आपण ३५ उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले असून, त्यापैकी १४ भूस्थित (जिओ स्टेशनरी) आहेत. आता आपले स्वतःचे उपग्रह तर अवकाशात पाठवितोच परंतु जर्मनी व कोरियासारख्या देशांचे उपग्रहही प्रक्षेपित करतो.

औद्योगिक क्षेत्रातील संशोधन व विकास आघाडीवरही काही बाबतीत आपण मोठे यश मिळविले आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपल्याकडे औषध उद्योगाची नामोनिशाणीही नव्हती, परंतु आता आपण जागतिक औषध उद्योगातील एक प्रमुख देश बनलो आहोत. त्यामुळे आपला देशांतर्गत आरोग्याचा दर्जा तर मोठ्या प्रमाणात सुधारला आहेच, परंतु आपल्या सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक औषधेही परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध होऊ लागली आहेत. दरम्यान, पेटंटविषयक धोरणांत झालेले नवे बदल लक्षात घेऊन आपल्याकडील अनेक औषध कंपन्या आता संशोधन व विकासास विशेष प्राधान्य देऊ लागल्या आहेत. त्यांच्या कामातील या स्वागतार्ह बदलामुळे यापुढे नव्या औषधांच्या निर्मितीचा मार्ग आपोआपच अधिक प्रशस्त बनणार आहे.

स्वयंचलित वाहन उद्योग क्षेत्रातही आपण लक्षणीय प्रगती केली आहे. पन्नास वर्षांपूर्वी ब्रिटिशांची 'मॉरिस ऑक्सफर्ड' भारतीय रस्त्यांवर 'ॲम्बॅसिडर' म्हणून धावत असे, परंतु आता संपूर्ण भारतीय बनावटीची 'इंडिका' मोटार लंडनच्या रस्त्यांवर सिटी रोव्हर' म्हणून धावू लागली आहे.

गेल्या काही काळात भारत हा जागतिक संशोधन व विकासाचे मुख्य केंद्र बनला असून, जगभरातील शंभरहून अधिक बड्या कंपन्यांनी आपापली संशोधन व विकास केंद्रे येथे सुरू केली आहेत. या केंद्रांमध्ये दहा-वीस नाही तर अक्षरशः हजारो कर्मचारी काम करीत असून, अर्थातच स्थानिक गुणवान युवकांच्या कल्पक सर्जनशीलतेस तिथे मोठा वाव मिळू लागलेला आहे. अमेरिकेतील 'जनरल मोटर्स'चे सर्वात मोठे संशोधन व विकास केंद्र बंगळूरमध्ये उभे राहिले असून, तिथे सध्या तेवीस कर्मचारी काम करीत आहेत. 'भारत' हे आता जागतिक ज्ञानोत्पादन केंद्र बनू लागले आहे, असे मी म्हणतो. तेव्हा माझ्या डोळ्यांपुढे हीच उदाहरणे असतात.

परदेशांमध्ये नोकरी-व्यवसायांनिमित्ताने परदेशांत गेलेले पंचवीस हजारहून अधिक भारतीय नागरिक गेल्या तीन वर्षांत मायदेशी परतले असून, त्यापैकी नव्वद टक्के माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत. त्यापैकी अनेकांनी अमेरिकेत राहण्याऐवजी भारतातील कंपन्यांत काम करणे पसंत केले आहे. या संदर्भात एका मोठ्या कंपनीच्या म्हणण्यानुसार, 'अमेरिकेतून परतलेले बहुतेक सर्व तरुण-तंत्रज्ञ येथे स्वतःचे व्यवसाय सुरू करण्यास उत्सुक असून, त्यामुळे आता आपल्याकडे 'ब्रेन ड्रेन' चा नाही तर 'ब्रेन गेन'चा जमाना सुरू झाला आहे.

ही सर्व बदलती परिस्थिती आपला विश्वास वाढविणारी आहे, परंतु यापुढील काळात 'व्हिजन २०२०' चे उद्दिष्ट साध्य करायचे तर आपल्याला विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारित पाच पदरी व्यूहरचनेचा अंगिकार करावा लागेल. त्यात प्राधान्य





राहील ते अर्थातच प्राथमिक मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शक्तीचा वापर करण्यास! अन्न, आरोग्य, पाणी, ऊर्जा, रोजगार आणि निवारा या प्राथमिक पण सर्वाधिक महत्त्वाच्या गोष्टी सर्वांना सहजतेने उपलब्ध होणे जरुरीचे असून, त्यासाठी प्रत्येक ठिकाणची विशिष्ट परिस्थिती (लोकल - स्पेसिफिक सिच्युएशन) लक्षात घेऊन काम झाले पाहिजे.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने नव्या संपत्तीची निर्मिती करणे,हा या व्यूहरचनेचा दुसरा पदर आहे. केवळ उद्योगधंद्यांच्या पातळीवर नव्हे तर व्यक्तिगत स्तरावरही त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

जैवतंत्रज्ञान, माहिती, नवे व पुन्हापुन्हा वापरता येण्याजोगे उर्जास्त्रोत आणि नवीन साहित्य व वातावरणाशी संबंधित कार्यक्रम अशा नव्याने उदयास आलेल्या ज्ञानाधिष्ठीत क्षेत्रांच्या विकासावर भर हा या व्यूहरचनेचा तिसरा टप्पा आहे. या सर्व क्षेत्रांत मोठी प्रगती करून जागतिक तंत्रज्ञानिक आघाडी काबीज करण्याची क्षमता भारताकडे आहे.

यापुढील काळात, केवळ आपल्याविषयी स्नेहभाव आहे

वा आपल्याकडे पैसे मिळतील म्हणून आपल्याला कोणीही अणुऊर्जा, संरक्षण संशोधन आणि अवकाश विज्ञान यासारख्या अतिमहत्त्वाच्या क्षेत्रांचे तंत्रज्ञान कदापिही उपलब्ध करून देणार नाही. ते तंत्रज्ञान आपल्याला स्वप्रयत्नांच्या बळावरच आत्मसात करावे लागेल. सुदैवाने गेल्या काही दशकांत आपण त्यादृष्टीने वाटचाल केली असून काही क्षेत्रांत स्वयंपूर्णताही प्राप्त करण्यात यश मिळविले आहे. ही स्वयंपूर्णता वाढीस लावणे हा नव्या व्यूहरचनेचा चौथा टप्पा राहील.

भारतीय वैज्ञानिक, संशोधक आणि यंत्रज्ञ-तंत्रज्ञ अतिशय उच्च गुणवत्तेचे आहेत. ही गोष्ट आता साऱ्या जगाने मान्य केली आहे. त्याचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे या मंडळींना सर्वदूर असलेली मोठी मागणी. जागतिक बाजारपेठांत भारतीय बनावटीच्या अन्य कोणत्याही उत्पादनापेक्षा भारतीय उच्च शिक्षण संस्थांतून बाहेर पडणाऱ्या उच्चशिक्षित युवकांना सर्वाधिक मागणी व मान्यता आहे. केवळ विकसनशील नव्हे तर बड्या प्रगत देशांमधीलही विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीत भारतीयांचा फार मोठा वाटा असून, त्याची पावती वेळोवेळी मिळत असते. आता आपण आपली ही सारी गुणवान मंडळी एकत्र आणून नव्या भारताची- 'टीम इंडिया स्पिरीट'ची उभारणी का करू शकणार नाही? हे आपण निश्चितच करू शकू, असे मला तरी ठामपणे वाटते. अर्थात त्यासाठी सर्वाधिक गरज आहे ती आपल्याकडील गुणवंतांना आव्हानक पण प्रगतीस पोषक वाटेल असे योग्य वातावरण उपलब्ध करून देण्याची! ते आपण उपलब्ध करून देऊ शकलो तर ही मंडळी निश्चितच अधिक जोमाने व उत्साहाने कामास लागतील आणि त्यांचा अभ्यास व मेहेनतीच्या बळावर हा सारा देशच अधिक प्रगती व समृद्धीच्या दिशेने वाटचाल करू लागेल. आपल्या शिक्षण संस्थांमध्ये तयार होणाऱ्या उच्च प्रशिक्षित मनुष्यबळाचा यथोचित वापर देशाच्या प्रगतीसाठी करून घेणे ही मुख्यतः सरकारची जबाबदारी आहे, हे मात्र येथे आवर्जून नमूद केले पाहिजे. नव्या सहस्रकातील साऱ्या भारतीय आशाआकांक्षा आपल्या या सर्वार्थाने संपन्न म्हणाव्या अशा मनुष्यबळावर अवलंबून आहेत. त्यावर उच्च शिक्षण-प्रशिक्षणाचे संस्कार करणाऱ्या शिक्षणसंस्था हे आपले फार मोठे वैभव आहे. ते टिकविण्यास आणि जोपासण्यास सर्वाधिक प्राधान्य देणे हा नव्या व्यूहरचनेचा पाचवा भाग राहील.

आपल्या समाजाच्या बौद्धिक, भावनिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग हे स्थान विज्ञानास प्राप्त करून देणे आणि विज्ञाननिष्ठ ही एक सामाजिक चळवळ बनविणे



ही केवळ सरकारची नाही तर जीवनाच्या विविध क्षेत्रातील नेते, समाजगट आणि बिनसरकारी संघटनांचीही जबाबदारी आहे. जीवन व निसर्गाबरोबरचे सामंजस्य वाढविणे आणि मानवी विकासाच्या असीम क्षमतांचा शोध घेणे हे भारतीय संस्कृतीचे फार प्राचीन वैशिष्ट्य आहे. आता भविष्यात मानवी विकास प्रक्रियेत विज्ञान व अध्यात्माची सांगड घालून साऱ्या जगाचे नेतृत्व करण्याची आकांक्षा भारताने बाळगली पाहिजे. नितीशास्त्राची जोड मिळालेले विज्ञान हा आपल्या विकासप्रक्रियेचा मुख्य कणा बनविणे, हेच आज तरी आपल्यापुढील सर्वात मोठे आव्हान आहे आणि ते पेलण्यास आपण निश्चितच समर्थ आहोत.

गोल्डमन अँड सच यांनी केलेल्या एका भाकिताचे स्मरण करून देत मी हा लेख संपवित आहे. त्या भाकितानुसार '२०५० साली या जगाचे नेतृत्व चीन-अमेरिका व भारत या त्रिमूर्ती कडेच येणार आहे. मी एक पाऊल पुढे जाऊन असे म्हणेन की, २०२० सालपर्यंत भारत आपले सर्व पत्ते योग्यप्रकारे खेळेल तर तो जगातील अव्वल क्रमांकाचे ज्ञानोत्पादन केंद्र अगदी निश्चितपणे बनेल. भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राचे सामर्थ्य खरोखरच खूप मोठे आहे.

■■■



# शेतीत भोगलं, तेच कवितेतून मांडलं

**नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा मानाचा जनस्थान पुरस्कार प्रसिद्ध कवी ना. धों. महानोर यांना २७ फेब्रुवारी, २००९ रोजी नाशिक येथे श्री. रामदास भटकळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी श्री. महानोर यांनी व्यक्त केलेले मनोगत व या समारंभाचा वृत्तांत आवर्जून येथे देत आहोत.**

शेतीत भोगलं, तेच कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केला. शब्दु कुठून आले हे कळलेच नाही. आईच्या जात्यावरील ओव्या, संत साहित्य, इतरांच्या कविता वाचल्या. त्यातून स्वतःचे पुनर्भरण करत गेलो. जनस्थान पुरस्काराच्या रुपानें चिरंजीव होण्याचा मान आईच्या ओवीतून मिळाला. इतरांचे वाचले, पचवले. त्यातून स्वतःची निर्मिती केली, अशी कृतज्ञ भावना प्रसिद्ध रानकवी ना. धों. महानोर यांनी व्यक्त केली.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दर दोन वर्षांनी दिला जाणारा 'जनस्थान पुरस्कार' श्री. महानोर यांना प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

महाकवी कालिदास कलामंदिरात २७ फेब्रुवारीला सायंकाळी पॉप्युलर प्रकाशनचे डॉ. रामदास भटकळ यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. एक लाख रुपये, मानपत्र सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल अध्यक्षस्थान होते. प्रतिष्ठानच्या प्रबंधन समितीचे अध्यक्ष आमदार डॉ. वसंतराव पवार, डॉ. भटकळ, सौ. सुलोचना महानोर, म्हैसकर प्रतिष्ठानच्या विश्वस्त सुधाताई म्हैसकर, आमदार हेमंत टकले, प्रतिष्ठानचे कार्यवाह विलास लोणारी व्यासपीठावर होते.

मराठी साहित्यातील १९४५ ते १९६५ या कालखंडाचा गौरव करुन सध्याची स्थिति 'आडातच नाही तर पोहोऱ्यात कुठून' अशी असल्याची खंत श्री. महानोर यांनी व्यक्त केली. शेतीपुढील प्रश्नाचे स्वरूप मांडताना त्यांनी 'शेती सोडून पळू जाऊ नको' असा वडीलकीचा सल्ला शेतकऱ्यांना दिला. शेती, शेतकरी जिवंत राहिला, तरच महाराष्ट्र जिवंत राहील. शेतीत जगणे, लीन होणे महत्वाचे. दुष्काळ, आत्महत्यांबाबत त्यांनी 'हा काळोखाचा रस्ता आपला नाही. उद्यावर भरवसा ठेव,' अशा शब्दांत आशावादही व्यक्त केला. आमदार असताना याच कवितांच्या जोरावर शेतकऱ्यांसाठी अनेक महत्वपूर्ण योजना राबवून घेण्यात यशस्वी ठरला, असेही त्यांनी सांगितले. माझे जगणे आणि माझी कविता कुठेही वेगळी नाही. त्यामुळे मी कविताच जगलो. सोबतच महाराष्ट्रातील शेतीला जलसंधारण, ठिबक सिंचन, पु. ल. देशपांडे कला अकादमी यांच्या रुपाने ठोस कामेही करू शकलो. एका शेतकरी कवीने आणखी काय द्यावे ? आज गोदातटी विविध भागांतील मोठ्या गोतावळ्याच्या उपस्थितीत कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या जनस्थान पुरस्काराच्या रुपाने साक्षात त्यांचा आशीर्वाद मिळाला. अशा कृतार्थ भावना व्यक्त करीत राज्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांप्रति हा पुरस्कार समर्पित करीत असल्याचे त्यांनी सद्‌गदित होऊन सांगितले. विविध कवितांची पेरणी करीत, राजकारण्यांच्या वागण्यावर मिश्किल, पण वस्तुस्थितीदर्शक भाष्य करीत तब्बल ७८ मिनिटे केलेल्या भाषणाने श्री. महानोर यांनी नाशिककर रसिकांना मंत्रमुग्ध केले.

श्री. महानोर पुढे म्हणाले, ''नाशिकनगरीची ही आनंदयात्रा इतकी भरगच्च पाहून मन भरून आले. तात्यासाहेबांच्या हातून, कल्पनेतून व विचारांतून बांधणी झालेल्या या पुरस्काराचे मोल मला सर्वाधिक आहे. माझ्या संपूर्ण ओबड-धोबड जीवनाला आकार देणाऱ्यांमध्ये त्यांचे स्थान मोठे आहे. त्यांच्या आठवणी डोळ्यांत साठवून व त्यांना नमस्कार करुन हा गौरव मी स्वीकारतो. तात्यासाहेबांचा हा प्रसाद रसिकांना व माझ्या शेतकरी बांधवांना अर्पण करतो. तात्यासाहेबांची कविता, नाटक, सामाजिक, वैचारिक शहाणपण व बांधीलकी हे होतेच, पण कडीकोयंडा नसलेल्या उघड्या घरात कोणीही यावं आणि आपलं सुखदुःख सांगावं इतके ते सकलांचे व सामान्यांचे होते. अवघ्या महाराष्ट्राचं



*श्री. जब्बार पटेल हे कवी महानोर यांना रानपत्र देत असून व्यासपीठावर शेजारी आमदार वसंत पवार , सौ. म्हैसकर, सौ. महानोर, रामदास भटकळ आणि आमदार हेमंत टकले.*

गणगोत जोडणारा तो एक दुवा होता. नाशिक हे काव्याचे तीर्थक्षेत्र आहे. एक ओंजळ घेऊन मी माझे आयुष्य उभे केले आहे. ज्या मातीत जगलो आणि जे भोगले ते शेवटच्या श्‍वासापर्यंत मी कवितेतून मांडीत राहिल. चिरंजीव होण्याचा मोठा टप्पा मला या जनस्थानने दिला असल्याचेही महानोर यांनी सांगितले. आपल्याला स्वतःची वाट तयार करता आली पाहिजे. मराठी साहित्याचा १९४५ ते ७५ हा कालखंड श्रीमंत होता. स्वतःचे पुनर्भरण करून घेतल्याशिवाय समृद्ध होता येत नाही हे मी शिकलो. अनेक पुस्तके वाचली. या पुस्तकांनी आत्मविश्‍वास दिला. शेतीत अनेक प्रयोग केले. अनेक योजना आणल्या. काट्याच्या रस्त्यावर महाभारतातील एकलव्य माझा आदर्श होता. एकटेपणाने मी विद्या मिळवीत गेलो. शून्यातून उभे राहण्याची ऊर्जा याच एकलव्याने दिली. कवितेवर भरभरून प्रेम केले. शंभर वर्षांची निसर्गकविता रसिकांसमोर ठेवली. स्वतःच्या कवितांवर प्रेम करण्याबरोबरच दुसऱ्याच्याही कवितेवर प्रेम केले असेही त्यांनी सांगितले.

पळसखेडच्या एका शेतकऱ्याला रसिकांनी महाराष्ट्राचा कवी करून टाकलं. याच रसिकांनी मला भक्कम लिहिण्याचे बळ दिले. नावलौकिक दिला. मी तिथेच शांत एकांतासोबत शेतीतच पाय ठेवून राहिलो. उतलो मातलो नाही, कुठल्याही प्रलोभनाला बळी पडलो नाही. ज्या कवितेने जगभरचं दिलं तिचा पोत आजवर माझ्या परीने सांभाळत आहे. कवितेसारखीच बरड माळरानावर नवी सृष्टी नवी निर्मिती करण्यातला माझा आनंद सांगता येणारा नाही, तो शेतीच्या प्रयोगांच्या रुपाने, कवितेच्या रुपाने महाराष्ट्राला वाटत राहिलो. सगळ्याच बाजूने सन्मानाचे हार गळ्यात पडत असताना नको तसे प्रहारही झाले, अशी खंतही महानोर यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात जब्बार पटेल यांनी कवी महानोर यांच्या काही आठवणी सांगितल्या. आपल्या साहित्यिकांनी खूप चांगले लिहून ठेवले आहे. परंतु जोपर्यंत त्याची भाषांतर होत नाहीत तोपर्यंत साच्यात अडकून राहण्याशिवाय पर्याय नाही. महानोर हा समीक्षकांसाठी आव्हानाचा विषय असून हे समजून घेऊन त्यांच्यावर एखादे पुस्तक काढण्याची गरज असल्याचे पटेल म्हणाले. महानोरांच्या अजिंठा काव्यावर लवकरच एक चित्रपट निर्माण करण्याविषयीचे सूतोवाचही जब्बार पटेल यांनी यावेळी केले.

दरम्यान, जनस्थान पुरस्कार प्रबंधक समितीचे अध्यक्ष आ. डॉ. वसंत पवार यांनी पुरस्कार निवडीमागील प्रक्रिया विशद केली. तसेच जनस्थान पुरस्कार या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व स्वीकारलेल्या मुंबईच्या म्हैसकर प्रतिष्ठानतर्फे सौ. सुधाताई म्हैसकर यांनी मनोगत व्यक्त केले. 'जनस्थान' पुरस्काराच्या पार्श्‍वभूमीवर कवी ना. धों. महानोर यांचा कवितांवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शुभदा तांबट, रागिनी कामतीकर, विवेक केळकर, शाम पाडेकर यांनी महानोरांच्या रचना सादर केल्या. 'रान' पत्राचे वाचन किशोर पाठक यांनी केले तर जनस्थान पुरस्कार मिळाल्याबद्दल केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी पाठविलेल्या पत्राचे वाचन विलास लोणारी यांनी केले. कालिदास कलामंदिर पूर्णपणे 'गावरान' बनविणारे नेपथ्यकार अरूण पाटील यांचे तसेच कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिलेल्या पद्मश्री भवरलाल जैन, डॉ. व्ही. एन. लोखंडे, कर्मवीर आण्णासाहेब रणधीर, रामकृष्ण नायक, अजय वैद्य याशिवाय महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरुन आलेल्या रसिक श्रोत्यांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. विलास लोणारी यांनी केले. आमदार हेमंत टकले, विश्‍वास ठाकूर, प्राचार्य हर्षवर्धन कडेपूरकर यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा भांडारे यांनी केले.

■■■

## लिहिते करण्यापाठीमागे नियती

**आई जात्यावर दळताना म्हटलेल्या ओव्यांतून मी घडत गेलो. स्वतःची वाट स्वतःच तयार केली. अशावेळी हे शब्द आले कुठून असा प्रश्‍न नेहमीच पडतो. परंतु मी नरेंद्र दाभोळकर आणि श्रीराम लागू यांची माफी मागतो. कारण मला लिहिते करण्यापाठीमागे नियती आहे. कुणी तरी सरस्वती आहे. मी अंधश्रद्ध नाही. परंतु या नियतीनेच माझ्याकडून लिहून घेतल्याचे महानोर यांनी यावेळी सांगितले. शेतात राहून मी जे जगलो तेच माझ्या कवितेत उतरत गेले. 'आंब्याच्या झाडाला मोहराचा वास झेपता झेपेना' यासारख्या ओळी लिहिल्या तेव्हा महानोर हा रोमँटिक कवी आहे असा प्रचार केला गेला. परंतु प्रेमाइतकी सुंदर गोष्ट या जगात नाही. मी जे प्रेम मांडले ते निसर्गातून आले आहे. ते मानवी आहे, असेही महानोरांनी स्पष्ट केले.**



# क्रीडाविश्वावरील कलंक

- मुकुंद मोघे

**पाकिस्तानच्या दौऱ्यावर असलेल्या श्रीलंका क्रिकेट संघावर 'अज्ञात' दहशतवाद्यांचा झालेला हल्ला म्हणजे समस्त क्रीडाविश्वावरील कलंकच मानावा लागेल. खरे पाहाता, पाकिस्तानची भूमी ही तशी फार पूर्वीच 'दहशतवाद्यांची आगर' बनली आहे.**



अगदी ऐनवेळी ठरविण्यात आलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या छोटेखानी मालिकेसाठी पाकिस्तानच्या दौऱ्यावर असलेल्या श्रीलंका क्रिकेट संघावर 'अज्ञात' दहशतवाद्यांचा झालेला हल्ला म्हणजे समस्त क्रीडाविश्वावरील कलंकच मानावा लागेल. खरे पाहाता, पाकिस्तानची भूमी ही तशी फार पूर्वीच 'दहशतवाद्यांची आगर' बनली आहे. त्याची कल्पना असल्यामुळेच गेल्या दीड दोन वर्षात एकाही परकी क्रिकेट संघाने त्या देशात जाऊन खेळण्याचे धाडस केले नव्हते. यावेळी ते धाडस करण्याची पाळी भारतीय संघाची होती, परंतु गेल्या नोव्हेंबरात पाकिस्तानी दहशतवाद्यांनी आपल्या मुंबापुरीत सलग चार दिवस हिंसाचाराने थैमान घातले आणि मग भारत सरकारच्या आदेशानुसार बीसीसीआयने आपल्या संघास पाकिस्तानात न पाठविण्याचा सुज्ञ निर्णय घेतला. खेळाडूंच्या एकंदर सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय योग्य असला तरी पाकिस्तान क्रिकेटसाठी मात्र तो आपत्तीदायकच होता. अखेर त्यातुन मार्ग काढण्यासाठी तेथील क्रिकेट नियामक मंडळाने शेजारी श्रीलंकेचे पाय धरले आणि दीर्घावधीनंतर परकी संघाच्या खेळाडूंचा खेळ पाहाण्याची संधी पाकिस्तानच्या सर्वसामान्य क्रिकेटरसिकांना मिळवून दिली. परंतु दहशतवादाचे सावट असल्याने कराचीतील पहिल्या कसोटीस प्रेक्षकांचा प्रतिसाद तसा अल्पच राहिला. अर्थात ती कसोटी दोन्ही संघातील उत्तम फलंदाजांच्या विक्रमी खेळींनी गाजली तशीच कोणताही अनुचित प्रकार न होताही पार पडली हे महत्वाचे. त्या यशामुळे हुरळून जाऊन की काय, त्यानंतर लगेचच स्थानिक प्रसिद्धी माध्यमांनी पाकिस्तानात खेळणे अन्य देशांच्या क्रिकेटपटुंसाठी अजिबात धोकादायक नाही,'' असा प्रचार करण्यास सुरुवात केली. परंतु कराची कसोटी शांतपणे पार पडणे ही अखेर वादळापूर्वीची शांतताच ठरली. पुढील







*गोळीबाराचे वृत्त ऐकल्यानंतर प्रिती झींटाला आपले अश्रु लपविता आले नाहीत.*

लाहोर कसोटीचे दोन दिवस ती शांतता टिकली परंतु तिसऱ्या दिवशी मात्र स्टेडियमकडे निघालेल्या श्रीलंका संघास दहशतवाद्यांच्या भयानक हल्ल्यास अचानकपणे सामोरे जावे लागले. एके ४७ रायफली, हातबॉम्ब व पिस्तुलांचा स्वैरपणे वापर झालेल्या त्या हल्ल्यात कर्णधार जयवर्धने, समरवीरा व मेंडिससह सहा खेळाडू किरकोळ जखमांवर निभावले परंतु त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या आठ सुरक्षा कर्मचाऱ्यांना मात्र आपले प्राण गमवावे लागले. विशेष म्हणजे आता आठवडा उलटून गेला तरी हल्लेखोर दहशतवादी नेमके कोण होते, हे स्पष्ट झालेले नाही. काही मंडळींनी त्याची जबाबदारी एलटीटीईवर टाकायला सुरुवात केली आहे तर अन्य काहींनी त्यामागे भारताचा हात असू शकतो,' असे सुचित करायचा हलकट प्रयत्न चालविला आहे. एकूणच हा सारा प्रकार अतिशय धक्कादायक आणि क्लेशकारक असून, त्याचा निषेध करावा तेवढा थोडाच ठरणार आहे. दहशतवादाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चाचली असून त्यास साऱ्या जगाने एकजूट होऊन वेळीच पायबंद घालणे, ही आता काळाची गरज बनली आहे. त्याकडे दुर्लक्ष केले तर लाहोरमधील हिंसाचाराची पुनरावृत्ती केवळ क्रिकेट नव्हे तर अन्य सर्व छोट्या-मोठ्या लोकप्रिय खेळांच्या मैदानांवर होण्यासही फार वेळ लागणार नाही, हे निश्चित.

### सध्या चर्चा क्रिकेट आणि क्रिकेटचीच...

सरत्या फेब्रुवारी महिन्यात तमाम क्रीडाविश्वात मुख्यः केंद्रस्थानी राहिला तो क्रिकेटचा खेळच! दहशतवादाच्या सावटामुळे पाकिस्तानचा संकल्पित दौरा रद्द झाल्यानंतर 'स्टॉप गॅप अॅरेंजमेंट' म्हणून या महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात भारतीय क्रिकेट संघाने श्रीलंकेला भेट दिली आणि पाच एकदिवस व एक 'ट्वेंटी-ट्वेंटी' सामन्यांच्या मालिकेत यजमान संघाला




अक्षरशः चारी मुंड्या चित केले. आपली धडाकेबाज सलामीवीरांची जोडी गौतम गंभीर व सेहवाग यांच्याप्रमाणे युवराजसिंह, सुरेश रैना व खुद्द कर्णधार धोनी हे सारेच फलंदाज त्या मालिकेत इतक्या भरात होते की बस्स! त्यांच्या तुफानी खेळामुळे भारतीय संघाने बव्हंशी सर्वच सामन्यांत तीनशेहून अधिक धावांचा डोंगर अगदी सहज उभा केला आणि मग प्रतिस्पर्धी संघास दोन-अडीचशे धावांत गुंडाळून आपल्या झहीरखान-इशांत शर्मा आणि प्रवीणकुमार या गोलंदाजांनी भारताचा विजय ही अक्षरशः औपचारिकता ठरविली. एक दिवसीय सामन्यांची ही मालिका धोनी आणि त्याचे सहकारी ४-१ अशी जिंकत असतांना श्रीलंकेकडून नेहमीप्रमाणे चमकदार खेळ केला तो आता चाळीशीच्या उंबरठ्यावर असलेला जयसूर्या आणि भरवशाचा कुमार संगाकारा या जोडीनेच. त्यापैकी जयसूर्याने मालिकेतील पहिल्याच सामन्यात तडाखेबंद शतक झळकावून आपण अजून संपलेलो नाही, हे सिद्ध करुन दिले. परंतु त्याच्या या जिगरबाज खेळास कर्णधार जयवर्धनेसह अन्य कोणाचीच फारशी साथ शेवटपर्यंत मिळाली नाही. विशेष म्हणजे श्रीलंकेचे सारे खंदे फलंदाज असे अवसान घातकी खेळत असतांना विश्वविक्रमी मुरलीधरन आणि 'नवा तारा' मेंडिस या फिरकी गोलंदाजांनाही काही करामत करुन दाखविता आली नाही. त्यापैकी मुरलीधरनने आपला ३२८ वा सामना खेळतांना पाकिस्तानच्या वासिम अक्रमचा सर्वाधिक ५०३ बळींचा विश्वविक्रम जरुर मोडला परंतु फलंदाजांचे नंदनवन असलेल्या 'फ्लॅट', निर्जीव खेळपट्ट्यांवर सारे सामने खेळविले गेल्यामुळे की काय त्याच्या 'फिरकीची जादू' शेवटपर्यंत अनुभवास येऊ शकली नाही.



भारतीय संघाच्या या यशोमालिकेस गालबोट म्हणावे असे लागले ते फक्त 'सदाबहारन सचीनकडून ! पहिल्या तिन्ही सामन्यात हा जगातील अव्वल फलंदाज पंचांच्या चुकीच्या निर्णयांचा बळी ठरला आणि मग त्यामुळे निराश होऊन की काय, नंतर त्याने




‘विश्रांती’ घेणेच पसंत केले.

श्रीलंकेत भारत-श्रीलंका सामने रंगत असतांना तिकडे ऑस्ट्रेलियात दक्षिण आफ्रिकेपाठोपाठ न्यूझीलंडनेही यजमान संघाच्या नाकात दम आणला आणि त्या संघाच्या ‘विश्वविजेतेपदांच्या मक्तेदारीला आणखी एक तडा दिला. “चॅपेल हॅडली करंडका” साठी झालेली ही पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका, अखेरच्या सामन्यात पावसाचा व्यत्यय आल्यामुळे २-२ अशी बरोबरीत सुटली. पण ऑस्ट्रेलियाच्या नव्या संघात आता पूर्वीचा जोष आणि तेज राहिलेले नाही, हे मात्र पुन्हा एकदा निर्विवादपणे सिद्ध झाले. मॅकग्रा, वॉर्न, हेडन, मार्टिन आणि गिलख्रिस्त हे पाच ‘पांडव’ निवृत्त झाल्यामुळे कर्णधार पॉंटिंग सध्या चांगलाच अडचणीत आलेला आहे. एकीकडे विजेतेपदाची मक्तेदारी टिकवून धरण्याची फलंदाजीही आता पूर्वीइतकी हुकुमी होतांना दिसत नाही. अर्थात फेरबांधणीची प्रक्रिया सुरु असते तेव्हा कोणत्याही संघास या दिव्यातून जावेच लागते. त्यामुळे ऑस्ट्रेलियाच्या सध्याच्या ‘फ्लॉप फॉर्म’ ला फारसे महत्व न देणेच योग्य ठरेल.

गेला दशकभराहून अधिक काळ ‘फ्लॉप’ म्हणूनच वावरणाऱ्या एकेकाळच्या ‘टॉप’ वेस्ट इंडिज संघाने पाहुण्या इंग्लीश संघाविरुद्धचा पहिला कसोटी सामना अगदी अनपेक्षितपणे जिंकून साऱ्या क्रिकेट जगतास आश्चर्याचा धक्का दिला आहे. किंग्जटन जमेकात खेळल्या गेलेल्या त्या सामन्यात वादग्रस्त माजी कर्णधार पीटरसनच्या ९७ धावांच्या खेळीच्या बळावर तीनशे धावांचा पल्ला पार केला खरा, परंतु नंतर त्यांच्या गोलंदाजांना मात्र गुणी पण बेभरवशी विंडीज फलंदाजांना मात्र अजिबात जमले नाही. कर्णधार गेल व सरवान यांनी शतके ठोकून आपल्या संघास चारशेच्या घरात पोचविले आणि मग त्यांच्या खेळापासून स्फूर्ती घेऊन की काय, वेस्ट इंडिजच्या जलदगती टेलर व नवा फिरकी गोलंदाज सुलेमान बैन या दुकलीने इंग्लंडचा दुसरा डाव अवघ्या ५१ धावांत गुंडाळून आपल्या संघाला सर्वथा अविश्वसनीय म्हणावा असा मोठा विजय मिळवून दिला. या सामन्यांत बैनने एकूण आठ बळी घेतले तर इंग्लंडची दुसऱ्या डावात दाणादाण उडवितांना टेलरने अवघ्या ११ धावां देऊन पाच फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखविला.

त्या दुकलीच्या या पराक्रमास आणि वेस्ट इंडिज संघात नव्याने निर्माण झालेल्या उत्साहास किंचित ग्रहण लागले ते सेंट जोन्स येथील दुसऱ्या कसोटीस ! मैदान खेळण्यायोग्य नसल्याच्या अजब कारणामुळे हा सामना जेमतेम ७-८ चेंडूंच्या खेळानंतरच थांबविण्यात आला आणि मग तो रद्दच करुन दोन्ही संघांचे खेळाडू तिसऱ्या कसोटीसाठी लगेचच ॲंटिग्वात दाखल झाले.

पहिल्या कसोटीतील अवमानकारक हार आणि दुसऱ्या कसोटीचा 'फियास्को' अशी निराशाजनक पार्श्वभूमी असतांना इंग्लीश कर्णधार ॲण्ड्रयु स्ट्रॉसने येथे १६९ धावांची दणदणीत खेळी करुन आपल्या संघात एक नवचैतन्य निर्माण केले. त्याच्या या अप्रतिम खेळास कॉलिंगवुडच्या शतकाची सुरेख जोड मिळाल्यामुळे इंग्लंडने ५६६ धावांचा डोंगर उभा केला आणि यजमान संघापुढे आव्हान उभे केले. ते पेलतांना एक सरवान वगळला तर बाकी सर्व विंडीज फलंदाज एकवेळ साफ नामोहरम झाले होते. सरवानने या कसोटीच्या पहिल्या डावात ९७ तर दुसऱ्या डावात ०६ धावा फटकावल्या पण त्याचा हा पराक्रम अखेर व्यर्थ ठरला नाही तो मात्र विंडीजच्या अगदी तळाच्या फलंदाजांमुळेच ! एडवर्डस आणि पॉवेल या दहा व अकरा क्रमांकाच्या फलंदाजांनी सामन्याच्या शेवटच्या दिवशी शेवटची तब्बल दहा षटके किल्ला लढविला आणि अगदी हाता-तोंडाशी आलेल्या विजयापासून इंग्लंडला वंचित ठेवले. अर्थात हा सामना अनिर्णित राहिल्यामुळे या मालिकेत विंडीजची आघाडी कायम राहिली असली तरी उर्वरित दोन सामने जिंकून इंग्लंडचा संघ डाव उलटवू शकतो हे निश्चित.

प्रतिस्पर्धी संघावर असा डाव उलटविण्याची किमया नुकतीच पाकिस्तानने श्रीलंकेविरुद्ध करुन दाखविली आहे. तब्बल चौदा महिन्यांनंतर मायदेशात कसोटी क्रिकेट खेळण्याची संधी मिळालेल्या पाकिस्तानी खेळाडूंची श्रीलंकेविरुद्धची पहिली कसोटी २१ ते २५ फेब्रुवारी या काळात कराचीत पार पडली. भारताविरुद्ध नुकत्याच झालेल्या एक दिवसीय सामन्यांच्या मालिकेत साफ निष्प्रभ ठरलेल्या श्रीलंका संघाने या कसोटीत टॉस जिंकून प्रथम खेळतांना ७ बाद ६४४ अशी विक्रमी धावसंख्या रचली. कर्णधार जयवर्धने २४० व समरवीरा २३१ यांची जोमदार द्विशतके आणि चौथ्या विकेटसाठी त्यांनी केलेली ४३७ धावांची विक्रमी भागी हे श्रीलंकेच्या या डावाचे वैशिष्ठ्य होते. त्यास चोख प्रत्युत्तर देणे अनेक वादविवादांच्या घेऱ्यात अडकलेल्या पाक संघास कितपत जमेल, याबद्दल सर्वांच्याच मनात शंका होती. परंतु त्या संघाचा नवा कर्णधार आणि मुरब्बी, शैलीदार फलंदाज युनिस खानने चक्क त्रिशतक ३१३ झळकावून आपल्या संघाची मान उंचावली. युनिसच्या या लाजवाब खेळीस पुढे जिद्दी यष्टीरक्षक कामरान अकमलच्या झकास शतकाची (नाबाद १५८) जोड मिळाली आणि मग पाकिस्तानने ७ बाद ७६५ वर आपला पहिला डाव घोषित केला. प्रतिस्पर्ध्यांच्या या स्पिरीटेड रिप्लायला दबकून की काय दुसऱ्या डावात श्रीलंकेची अवस्था ५ बाद १२० अशी झाली



होती आणि तो संघ पराभवाच्या उंबरठ्यावर पोचला होता. संगाकारच्या झुंझार खेळामुळे ती आपत्ती अखेर टळली असली तरी आता दुसऱ्या कसोटीत पाकिस्तानचेच पारडे जड राहील, अशी स्पष्ट चिन्हे आहेत.

फेब्रुवारीचा प्रारंभ भारताच्या श्रीलंकेतील मालिकेने झाला तर आता अखेर न्युझीलंड दौऱ्यातील दोन ट्वेंटी ट्वेंटी लढत भारताने खेळाच्या सत्रात युसुफ व इरफान या पठाण बंधुंच्या झोकदार फटकेबाजीच्या जोरावर जिंकली होती परंतु न्युझीलंडमध्ये मात्र 'आपली अवस्था गर्जेल तो पडेल काय', अशीच काहीशी झाली आहे. तेथील दोन्ही सामन्यात भारताला सलामीवीर सेहवागने दणदणीत सुरुवात करुन दिली. सामन्याच्या पहिल्याच षटकात तीन-तीन षटकार खेचणारा हा खेळाडू बाद झाल्यावर मात्र त्याच्या सहकाऱ्यांनी अवसान घातकी खेळ





होती, पण आता मात्र तिने 'टॉप हंड्रेड' मध्ये पुनरागमन केले आहे.

पट्टायाची स्पर्धा आटोपल्यानंतर दोनच दिवसात 'दुबई ओपन'मध्ये खेळावे लागल्यामुळे की काय, सानियाचे तेथील आव्हान दुसऱ्या फेरीतच संपले. आता आपला 'स्टॅमिना' वाढविण्यासाठी ती भूतपूर्व 'सुपरस्टार' आंद्रे आगासीच्या मार्गदर्शकांचे सहाय्य घेणार असल्याचे वृत्त आहे. तसे घडले तर आगामी काळात सानियाच्या नावावर अनेक 'सेन्सेशनल' विजय जमा होतील. याबद्दल आमच्या मनात तरी तिळमात्र शंका नाही.

दरम्यान, रॉडरमॅन येथील 'एबीएन ॲम्रो वर्ल्ड टेनिस' स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावून ब्रिटनचा 'उगवता तारा' ॲंडी मरेने नवा इतिहास घडविला. ही स्पर्धा जिंकणारा तो पहिलावहिला ब्रिटीश खेळाडू आहे. विशेष म्हणजे हा पराक्रम गाजविताना त्याने चक्क जगातील सध्याचा सर्वोत्तम टेनिसपटू रॅफेल नदालला ६-३, ४-६, ६-० असे सहजी पराभूत केले.

केला आणि मग यष्टीरक्षक फलंदाज ब्रँडन मॅक्लमच्या साहसी पण संयमित नाबाद अर्धशतकांच्या बळावर न्युझीलंडने दोन्ही सामने अगदी नियोजनबद्धरीत्या जिंकले, त्या संघात कर्णधार व्हिटोरीचा एकमेव सन्मान्य अपवाद वगळता बाकी सर्व नवीन चेहरे दिसतात... पण याच अननुभवी मुलांनी ऑस्ट्रेलियाला नुकतीच कडवी लढत दिली, हे विसरून चालणार नाही. अर्थात आता पन्नास षटकांचे एक दिवसीय सामने आणि कसोटी मालिकेत त्यांचा खेळ कसा होतो यावरच त्यांचे व त्यांच्या संघाचे एकूण भवितव्य अवलंबून राहाणार आहे. त्यांचे नवशिकेपण एनकॅश करण्यात धोनी व त्याचे नवे-जुने सहकारी यशस्वी झाले तर चाळीस वर्षानंतर प्रथमच भारतीय संघाच्या न्यूझीलंड वारीची सांगता यशाने होईल. पाहू या काय होते ते!

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे सध्या सर्वदूर क्रिकेटचे वातावरण असले तरी याच महिन्यात बँकॉकची 'पट्टाया ओपन' व 'दुबई ओपन' या दोन महत्त्वाच्या टेनिस स्पर्धा पार पडल्या आहेत. त्यापैकी पट्टायात आपल्या सानिया मिर्झाने अंतिम फेरी गाठताना जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असलेल्या मॅगदेलीना रिबारीकोवा व एक्केचाळीस स्थानावर असलेल्या थायलंडच्या तमारिनीस पराभवाचा धक्का दिला. तिची ही आगेकूच अखेर अंतिम लढतीत रशियाच्या वीरा झोवोनारिनाने रोखली, पण त्यासाठी तिला पूर्ण तीन सेट झुंझावे लागले. गेले वर्षभर दुखापतींमुळे आंतरराष्ट्रीय टेनिसपासून दूर असलेली सानिया या स्पर्धेपूर्वी जागतिक क्रमवारीत १२६ व्या स्थानावर घसरली



सध्या लिनारेस येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत आत्तापर्यंत तरी भारताच्या 'चेस किंग' विश्वनाथन आनंदची कामगिरी सुमारच झाली आहे. सातव्या फेरीअखेर तो साडेतीन गुणांसह चौथ्या स्थानावर असून, रशियाचा अलेक्झांडर ग्रिशचुक ही स्पर्धा जिंकेल, अशी चिन्हे आहेत.

दरम्यान, यंदाच्या 'वर्ल्ड चॅम्पियनशीप' मध्ये आनंदचा आव्हानवीर बनण्याचा मान बल्गेरियाचा ग्रँडमास्टर व्हिसीलीन टोपालोवने पटकावला आहे. गतसालचा उपविजेता गॅटा कॅमाकीला पराभूत करून, त्याने ही आगेकूच केली आहे. त्याचा सध्याचा 'फॉर्म' आणि आनंदचा लिनारेसमधील 'फ्लॉप

शो' लक्षात घेता या दोघांची लढत फार अटीतटीची होईल, असा जाणकारांचा होरा आहे. अर्थात तो कितपत खरा हे समजण्यासाठी आपल्याला आणखी काही महिने तरी प्रतिक्षा करावी लागणार आहे.

## फेल्प्स आता वादंगाच्या भोवऱ्यात

बीजिंग ऑलिम्पिकमध्ये ८ सुवर्णपदके पटकावून नवा विश्वविक्रम करणारा अमेरिकेचा युवा जलतरणपटू मायकेल फेल्प्स सध्या अंमली पदार्थांच्या सेवनामुळे वादंगाच्या भोवऱ्यात सापडला आहे. गेल्या महिन्यात अमेरिकेतील एका नियतकालिकात त्याची 'मार्जुअना' ओढतानाची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आणि सर्वत्र एकच खळबळ उडाली. आता युएसए स्विमिंग फेडरेशनन फेल्प्सवर तीन महिन्यांची बंदी घातली असून, अनेक बड्या कंपन्यांनी त्याच्याबरोबरचे करार रद्द केले आहेत. 'नो प्लेअर इज बिगर दॅन द गेम' हेच खरे!

## शोएबची गच्छंती तर जयवर्धनेचा राजीनामा!



इंझमाम उल हकसारख्या 'सुपरस्टार'च्या निवृत्तीनंतर पाकिस्तान क्रिकेट संघाचा मारूनमुटकून बनविलेला कर्णधार शोएब मलिकला आता त्या पदावरून हाकलले गेले आहे. तथाकथित युटिलीटी प्लेअर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मलिकच्या कारकिर्दीत पाकिस्तानी संघाची वाटचाल फ्रॉम बॅड टु वर्स्ट अशीच झाली. आता ही अधोगती रोखण्यासाठी जुन्या-जाणत्या युनिसकानकडे नेतृत्वपद सोपविण्यात आले आहे. श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत विक्रमी त्रिशतक झळकावून त्याने आपली निवड तर सार्थ ठरविली आहेच, पण पाकिस्तान क्रिकेटमध्ये एक नवे चैतन्यही निर्माण केले आहे.

दरम्यान, श्रीलंकेचा कर्णधार महेल जयवर्धनेने कर्णधारपद सोडले असून, पाकिस्तानविरुद्धची चालू मालिका संपल्यावर त्या पदाची सूत्रे कुमार संगाकाराकडे येतील.

## आयपीएलचे ललित मोदी संकटात



राजस्थान क्रिकेट असो. चे सर्वेसर्वा आणि आयपीएलचे कमिशनर ललित मोदी सध्या चांगलेच संकटात सापडले आहेत. एकीकडे भ्रष्टाचार व आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे सुरू झालेली न्यायालयीन कारवाई आणि दुसरीकडे राजस्थान क्रिकेट असो. मधील प्रतिस्पर्धी गटाने घेतलेला आक्रमक पवित्रा यामुळे मोदींची अवस्था 'इकडे आड, तिकडे विहीर' अशीच झाली आहे.

## दुलीप करंडक पश्चिमेकडेच!

चेन्नाईत ६ ते १० फेब्रुवारी दरम्यान झालेली 'दुलीप करंडक स्पर्धे'ची अंतिम लढत पश्चिम विभागाने आरामात जिंकली. सलामीवीर राहाणेने पहिल्या डावात १६५ तर दुसऱ्या डावात ९८ धावा फटकावून या विजयास सर्वाधिक हातभार लावला. त्याच्या तडफदार खेळामुळेच प. विभागाने पहिल्या डावात ४५९ धावांची मजल मारली. त्यास उत्तर देताना दक्षिण विभागाचा संघ जेमतेम १९९ धावाच करू शकला. त्यांचा सर्वाधिक अनुभवी खेळाडू आणि भारतीय संघाचा माजी कर्णधार राहुल द्रविडचे दारुण अपयश हे त्यांच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण ठरले. द्रविडने या सामन्यातील दोन डावात ५ व ० अशा धावा करून आपणआता संपलेलो आहोत, हे पुन्हा एकदा दाखवून दिले. अर्थात पूर्वपुण्याईमुळे न्यूझीलंड दौऱ्यासाठी राहाणेसारख्या नवयुवकाची नाही तर त्याचीच निवड झाली.

■■■